
जयश्री पटवर्धन
गुंफियेला शेला

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

स्मरणे आणि भावबंध

# गुंफियेला शेला

## लेखिका : जयश्री पटवर्धन

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# गुंफियेला शेला

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गुंफियेला शेला


## लेखिका : जयश्री पटवर्धन

पत्ता- 20/1A/1 प्लॉट नं 3, विनायक बंगला,
बसवनगर रोड
कागवाड 591223
कर्नाटक.
फोन नं- 7406983273



मुखपृष्ठ: सुनीळ सामंत (ठाणे)
निर्मितीसहाय्य- अंजना लगस (कोल्हापूर)



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यापुर्वी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

या नंबरवर नावगाव कळवा. पुस्तके मिळवा.

प्रकाशन : ३१ ऑगस्ट २०२२ (गणेश चतुर्थी २०२२)


©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जयश्री पटवर्धन



## परिचय

सांगली माझे माहेर. वयाच्या विसाव्या वर्षी मला एम. एस. ई .बी. मध्ये नोकरी मिळाली. सहा वर्षे नोकरी केल्यावर माझा विवाह कागवाड च्या श्री सतीश पटवर्धन यांचे बरोबर झाला. पटवर्धन घराणे हे संस्थानिकांचे. पण कूळ कायदा व 1948 ची जाळपोळ यामुळे त्यांचे बरेच नुकसान झाले. हे संस्थान 1857 मध्येच विलीन झाले होते. त्यामुळे पुढील पिढ्यातील मुलांनी अर्थार्जनासाठी शिक्षणानंतर नोकरी स्विकारली. पटवर्धन मंडळी खेड्यात राहात असली तरी खूप आधुनिक विचारांची व अतिशय सुसंस्कृत अशी होती. मनाने ती श्रीमंत होती. त्यामुळे सांगली सारख्या शहरातून मी खेड्यात आले याचे दुःख मला झाले नाही. वयाच्या चाळीसाव्या वर्षापासून मी सामाजिक कार्यात भाग घेऊ लागले व विविध सामाजिक उपक्रम राबविले. माझे वडील गीता प्रवचनकार होते. त्यामुळे लहानपणापासूनच कर्मयोगाचे संस्कार आम्हा सर्व भावंडांच्या वर झालेले होते. कागवाड येथील मराठी शाळेचे इमारत बांधकाम मी त्यात भाग घेऊन हिरिरीने केले. येथे विविध प्रकारची शिबिरे आम्ही घेतली. रक्तदान, नेत्रदान, अपंगांसाठी उपयोगी साधने देण्याचे शिबीर, मुलांसाठी शैक्षणिक शिबिर, महिला शिबीर, ही शिबिरे लोकांना खूपच आवडली.

मी वैयक्तिक स्तरावर ही सामाजिक कामे केली. मला वाचनाची अतिशय आवड. आवडलेल्या पुस्तकांच्या लेखकांना मी आवर्जून पत्र लिहायची. बऱ्याच लेखकांची मला उत्तरे देखील आली आहेत. त्यातूनच काही लेखकांची व्याख्यानेही येथे आयोजित केली.

मतिमंद मुलांकडून शाळेतून ज्या कलावस्तू बनवून घेतल्या जातात, त्या विक्रीच्या माध्यमातून मी लोकांसमोर आणीत होते. हेतू एवढाच की त्या मुलांना अर्थाजन व्हावे. या वस्तू विक्रीच्या वेळी एक चांगला अनुभव मला आला आहे. सांगली येथील गाडगीळ सराफ यांचेकडे मी जायचे ठरवले. सांगलीतील आमदार सुधीर दादा गाडगीळ यांना मी भेटले व मतिमंद मुलांसाठी च्या कलावस्तू विक्रीबाबतची माझी कल्पना त्यांना सांगितली. या गाडगीळ मंडळींचे विश्रामबाग येथेही सराफी दुकान आहे. दिवाळीच्या वेळी जर ग्राहकाने दहा ग्रॅम सोने घेतले तर त्याला त्यांच्या दुकानाच्या वतीने मतिमंद मुलांनी बनवलेल्या वस्तूपैकी एक वस्तू गिफ्ट म्हणून द्यावी. त्यात गाडगीळ यांचेही नाव होईल व मुलांना अधिक अर्थार्जन मिळेल. त्यांना ही कल्पना आवडली. आमदारांनी मला त्यांच्या दुकानी पाठविले. मी त्यांना वस्तुंचा कॅटलॉग दाखवला. त्यातून त्यांनी मोबाईल ठेवण्यासाठीची पर्स निवडली आणि एकंदर ऐंशी हजार रुपयाच्या मोबाईल पर्सेस मागविल्या. आम्हाला खूप आनंद झाला. खरंच दुसऱ्यासाठी काही करत असताना त्यात यश आले की मिळणारं समाधान वेगळच असतं!

मी कागवाड ग्रामपंचायतीमध्ये निवडून येण्यासाठी दोन वेळेला निवडणुकीस उभे राहून निवडून आले व दहा वर्षे ग्रामपंचायतीत काम केले. हेतू एवढाच होता की पंचायतीत चाललेला कारभार पहावा व समाजासाठी पंचायतीच्या वतीने काही

करता आले तर करावे. माझ्या आयुष्यात मी समाजाकडूनही भरपूर आदर मिळवला. पुढे निवडून आलेले सरपंचही माझा सल्ला विचारायला घरी येत असत. अर्थात मी जे हे सर्व करु शकले ते माझ्या पतीच्या पुर्ण पाठिंब्यामुळेच. असा नवरा मिळायलाही भाग्य लागते. ते मला मिळाले व त्यामुळे मी समाधानी आयुष्य जगू शकले.

-जयश्री पटवर्धन

# गुंफियेला शेला-
# विचार आणि व्यक्तिमत्वांची सुरेख गुंफण

**-दीपक तांबोळी**

समाजात काही व्यक्ती अशा असतात ज्यांचे विचार सगळयांसाठीच अनुकरणीय असतात, त्यांचं चरित्र आदर्श असतं आणि कार्यतर असं असतं की त्यामुळे अशक्य वाटणारी कार्य करण्याची प्रेरणा मिळत असते. जयश्री पटवर्धन यांचा लेखसंग्रह "गुंफियेला शेला " हा अशाच काही व्यक्तींचा आपल्याला परीचय करुन देतो.

या लेखसंग्रहाची सुरुवात सुप्रसिद्ध दिलीपराज प्रकाशनाचे प्रकाशक श्री.राजीव बर्वे यांचे वडिल श्री.द.गो.बर्वे उर्फ भाऊ यांच्यापासून केली आहे. प्राध्यापक असलेले भाऊ विद्यार्थीप्रिय होते. पैसा मिळवणे, चैन करणे याऐवजी त्यांनी स्वतःला लेखन व साहित्याला वाहून घेतलं होतं. बालवांङ्मयाचे लेखन करताकरता त्यांनी दत्ता टोळ, सुभाषचंद्र वैष्णव, देवपूरकर यांसारखे बालवांङ्मयाचे लेखकही घडवले. त्यानंतर त्यांनी स्वतःचीच दिलीपराज प्रकाशन ही संस्था सुरु केली. जी आज त्यांचे चिरंजीव राजीव बर्वे चालवतात.

लेखसंग्रहातील दुसरं आदर्श व्यक्तिमत्व आहे श्री.विजयराव आठवले. सी.ए.आणि आय.सी.डब्ल्यू.ए .झालेले विजयराव लेखिकेचे व्याही आहेत. आपण

आयुष्यात पुढे काय करायचं हे त्यांनी अगोदरच ठरवून ठेवलं होतं. त्यानुसारच ते जीवन जगत गेले.सी.ए.असुनही त्यांनी आपल्या कंपनीचे रुपांतर अल्फा डाटा सिस्टीम या साँफ्टवेअर कंपनीत केले. नंतर त्यांनी मध्यमवर्गीय माणसाला उपयुक्त असे "व्हाँल्ट" नावाचे साँफ्टवेअर बनवले. पुष्कळ विद्यार्थ्यांना भरपूर अभ्यास करुनही गुण मात्र कमीच मिळतात. याचं कारण त्यांना अभ्यास नेमका कसा करावा ते कळत नाही. विजयरावांच्या लक्षात आलं की बरेच विद्यार्थी परिक्षेत नापास होत नाहीत तर अभ्यास करण्यात नापास होतात म्हणून त्यांनी तज्ञ डॉक्टरांशी चर्चा करुन अशा विद्यार्थ्यांसाठी "पॉवर स्टडी " हे सॉफ्टवेअर तयार केलं. या सॉफ्टवेअरमुळे विद्यार्थ्यांचा खूप फायदा झाला.

काही माणसं अशी असतात की ज्यांना आपण समाजाचं काही देणं लागतो ही भावना मनात असते आणि त्या भावनेतून मग ते आपलं आयुष्य समाजाला वाहून टाकतात. अनिल रुईकर सर हे त्यातलेच. लहान मुलांवर लहानपणीच योग्य संस्कार केले तर मोठेपणी ती उत्तम नागरिक होतात ही भावना मनात ठेवून त्यांनी संस्कार वर्ग सुरु केले. सुरुवातीला त्यांच्या या वर्गाला लहान मुलं यायची. हळूहळू अशिक्षित, धुणीभांडी करणाऱ्या बायका या वर्गाला येऊ लागल्या. गीता पाठांतर वर्गाला जाण्याची सर्वांना ओढ वाटू लागली. या अशिक्षित महिलांनी श्रृंगेरी येथील शंकराचार्यांच्या मठात झालेल्या गीता पाठांतर स्पर्धेत भाग घेऊन रु.२५०००/- चं बक्षीसही मिळवून आणलं. गीता पाठांतर यावरच न थांबता रुईकर सरांनी मुलांना स्वयंशिस्त, परिसराची स्वच्छता, स्वावलंबन, पर्यावरण यांचेही संस्कार केले. श्री.रुईकर सर वृध्दाश्रमाचेही विश्वस्त आहेत. अशा प्रकारे सरांनी आपलं आयुष्य लहान मुलं,पालक, वृध्द अशा तिन्ही गटांसाठी समर्पित केलं आहे.

मतिमंद मुलांना सांभाळणं,त्यांना शिकवणं हे एक आव्हानात्मक आणि चिकाटीचं कार्य असतं. हे कार्य करण्यासाठी तसेच तळमळीचे कार्यकर्ते लागतात. स्मिता दिक्षित या अशाच तळमळीच्या कार्यकर्त्या आहेत. जिज्ञासा या मतिमंदांसाठी कार्यरत संस्थेच्या त्या संस्थापिका असून तिथेच त्या मुख्याध्यापिका म्हणून कार्य करतात. स्मिताजी केवळ ही संस्था स्थापन करुन थांबल्या नाहीत तर त्यांनी शामकमल या चॅरीटेबल ट्रस्टची स्थापना केली. या ट्रस्टद्वारे त्यांनी राही पुनर्वसन केंद्र, कमला केंद्र, साद असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले. आज या केंद्रात ७५ प्रौढ बौध्दिक अक्षम विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून २० प्रशिक्षक कार्यरत आहेत. या संस्थेत हस्तकला विभाग, फाईल मेकींग व स्क्रीन पेंटींग, क्रिडा विभाग असे विभाग असून येथील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अनेक पदकं प्राप्त केली आहेत.

गेली २० वर्षं स्मिता दिक्षीत यांचं हे कार्य अव्याहतपणे सुरु आहे. त्यांच्या कार्याला दाद दिलीच पाहिजे.

पुढचा लेख गुरुकृपा सामाजिक संस्था चालवणाऱ्या प्रशांत थोरात यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा आहे. गुरुकृपा संस्थेची एक सप्तसूत्री आहे. सुसंस्कृत बाल, सशक्त युवा, समाधानी वृध्द, निरोगी मानव, मजबूत मन, एकसंध समाज आणि समृद्ध पर्यावरण. या सप्तसूत्रीसाठी ते अनेक उपक्रम राबवत असतात.

गरीब कुटुंबात जन्म घेतलेले कै. रामचंद्र करकरे हे कडवे देशभक्त होते. तसेच ते अत्यंत बुध्दिमान विद्यार्थी होते. विश्वविद्यालयाने त्यांना सुवर्णपदक देवून गौरवले होते. श्री.करकरे यांनी अवघ्या १५व्या वर्षी स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती.

१९४४ साली स्वतः नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी करकरे यांची आझाद हिंद सेनेच्या मध्यभारत प्रांताच्या संयोजकपदी नेमणूक केली होती. करकरे जसे विचारवंत व कायदेतज्ज्ञ होते तसेच ते श्रेष्ठ कवी व लेखकही होते. जननी, मधुमाधवी, जय हिंद या त्यांच्या लोकप्रिय कलाकृती मानल्या गेल्या. स्वतंत्र भारतात त्यांनी मोठ्या मनाने मुख्यमंत्रीपद नाकारलं. शेवटी करकरे जिथे राहात होते त्या छत्री बाजारचे नामकरण कै.रामचंद्र करकरे मार्ग असं करुन ग्वाल्हेर निगमने त्यांचा सत्कार केला आहे. अत्यंत प्रेरणादायी असलेल्या या व्यक्तीच्या आठवणी युवा पिढीसाठी सदैव प्रेरणा देतील.

पुढचा लेख लेखिकेने आपले गुरु श्री.पाटील महाराज यांच्यावर लिहिला आहे. त्यात त्यांच्या बऱ्याच आठवणी सांगितल्या आहेत. आपल्या गुरुंमुळेच आपण प्रपंच व परमार्थ दोन्हीही यशस्वीरित्या करु शकलो आणि वयाच्या ८० व्या वर्षीही सुखी आणि समाधानी आहोत याची त्यांनी कबुली दिली आहे.

सामान्य माणसातही असामान्य व्यक्तिमत्त्व दडलेलं असतं.लेखिकेला आपला लहान भाऊ "शाम " हासुद्धा असाच वाटतो. लहानपणी भित्रा असलेला शाम मोठेपणी अचंबा वाटण्याइतपत धीट झाला.लेखिकेने त्याच्या लहानपणीच्या आणि तो मोठा झाल्यावरच्या काही आठवणी इथे नमूद केल्या आहेत. आईच्या आजारपणात त्याने आईची केलेली सेवा, बहिणींबद्दल वाटणारं प्रेम, कुणावरही संकट आल्यावर मदतीला धावून जाण्याची वृत्ती, वयाच्या ७२ व्या वर्षी आपले छंद जोपासण्याची धडपड याचं सुरेख वर्णन लेखिकेने केलं आहे.

माहेरवाशीण या लेखात प्रभाताई शिर्के यांनी बदलापूर येथे सुरु केलेल्या "माहेरवाशीण" या संस्थेची माहिती दिली आहे. लग्नानंतर काही. महिन्यातच पतीला हार्ट अटॅक आल्यामुळे प्रभाताईंवर पोळीभाजीचे डबे बनवण्याची वेळ आली. पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. पतीचा स्वर्गवास झाल्यावर त्यांनी महिलांसाठी माहेर घर सुरु केलं. त्यांच्या या आगळयावेगळया प्रकल्पामुळे माहेर नसलेल्या महिलांना माहेरचं सुख तर मिळू लागलंच शिवाय अनेक महिलांना रोजगारही मिळाला. जिद्द, चिकाटी व कष्ट यांच्या बळावर कितीही संकटं आली तरी त्यावर मात करता येते हा मोलाचा संदेश प्रभाताईंच्या कार्यातून मिळतो.

आजकाल सामाजिक भान असणारी माणसं भेटणं दुर्मिळच. राघवजी नरसाळे हे असंच एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व. लहानपणी आईवडिलांनी त्यांच्यावर उत्तम संस्कार केले. उत्तम मार्क मिळालेच पाहिजेत किंवा पहिलाच नंबर आला पाहिजे असं दडपण त्यांनी कधी मुलांवर आणलं नाही. राघवजींचं इंग्रजी खूप कच्चे होते, पण मुरुडेश्वर गुरुजींनी त्यांचं इंग्रजी इतकं पक्कं करुन घेतलं की व्याख्यानात राघवजी इंग्रजीत आपले विचार मांडू लागले.मुंबई ग्राहक पंचायतीची एक कार्यशाळा केल्यावर राघवजी तरुणपणीच मुंबई युवा कंझुमर्सचे अध्यक्ष झाले.त्या माध्यमातून त्यांनी ग्राहक जागृतीची अनेक कामं केली.पुढे राघवजींच्या केंद्र सरकारातील अनेक मोठमोठ्या लोकांशी ओळखी झाल्या.त्यातून त्यांना अनेक प्रोजेक्ट्स मिळत गेले.इतकं होऊनही राघवजींचं सामाजिक भान सुटलं नाही. पदरचे १७ लाख खर्च करुन त्यांनी नवी मुंबईतील रुग्णांसाठी रुग्णवाहिका खरेदी केली. या रुग्णवाहिकेचा ड्रायव्हरच्या पगारासह रु.तीस हजार खर्च राघवजी स्वतः सहन करतात. एका बहुराष्ट्रीय कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर आणि अर्थतज्ज्ञ असलेले राघवजी सामाजिक

कामासाठी वेळ कसे काढू शकतात हा प्रश्न विचारल्यावर त्यांचं उत्तर असतं "जो बिझी असतो त्यालाच वेळ असतो "

आपल्या छंदाने इतरांनाही आनंद मिळावा अशी वाटणारी काही छांदिष्ट मंडळी असतात. कालगांवकर सर हे त्यापैकीच एक. सरांना गाण्यांचं वेड, ज्याकाळी भारतात ग्रामोफोन होते त्यावेळेपासूनचं. या आवडीमुळे सरांना कुणाकडेही पडून असलेल्या रेकॉर्डस् जमा करण्याचा छंद लागला आणि या छंदामुळे त्यांना तऱ्हेतऱ्हेची माणसं भेटत गेली. नौशाद त्यांचे आवडीचे संगीतकार. दोन गाण्यांच्या कडव्यामधील संगीताच्या साम्याबद्दल एकदा त्यांनी थेट नौशादांनाच पत्र लिहिलं. नौशादांनीही त्याला उत्तर दिलं. त्या पत्रामुळे नौशादांना सरांच्या घरी यावं लागलं. फक्त अर्ध्या तासासाठी आलेले सरांकडे असलेल्या रेकॉर्डस् दोन तास ऐकत बसले.

सध्या कालगांवकर सरांच्या संग्रहात अंदाजे साडेचार हजार रेकॉर्डस्, सहा ग्रामोफोन्स आणि पंचावन्न रेकॉर्ड प्लेयर्स आहेत. आजच्या यूट्यूबच्या जमान्यात असा संग्रह सांभाळून ठेवणं नक्कीच कौतुकास्पद आहे.

सावरकरांची मार्सेलिस उडी या प्रकरणात लेखिकेने सावरकरांच्या कार्याची माहिती दिली आहे. ही माहिती आपण अनेकदा वाचली आहे तरीसुद्धा ती पुन्हा एकदा वाचलीच पाहिजे या पध्दतीने लिहिली आहे.

गोरज म्हणजे सायंकाळी घरी परततांना गाईच्या पायाने उडणारी धूळ. या वेळेला गोरज वेळ किंवा मुहूर्त मानून त्यावर अनेक लग्नं लागतात. ही वेळ तशी

कंटाळवाणी, सुस्त आणि मनाला नैराश्य आणणारी असते."मधु मागशी माझ्या सख्या परी " या कवितेत भा.रा. तांबे यांची एक ओळ "संध्याछाया भिवविती हृदया " ही ओळ अशीच मनाला हुरहुर लावून जाते. व्रुध्दापकाळ हा सुद्धा एक गोरजकाळच असतो. हा काळ वृध्दांसाठी कसा चांगला जाऊ शकतो याचं विवेचन लेखिकेने केलं आहे ते नक्कीच वाचण्यासारखं आहे. आरोग्याची काळजी घेण्यासोबतच वृध्दांनी व्हाँटस्अप, फेसबुक या गोष्टी शिकून घेतल्या पाहिजेत. वृद्धापकाळ हळूहळूच येतो, एकदम येत नाही. मग त्याचं नियोजन अगोदरपासूनच केलं पाहिजे असे योग्य विचार लेखिकेने मांडले आहेत.

प्रसाद, टाळी या लेखांमध्ये लेखिकेने या विषयांवरचे आपले विचार मांडले आहेत.

एकेकाचे अध्यात्म हा लेख माझ्या विचारांशी खूप मिळताजुळता आहे. देवापुढे बसून रहाणं, देवाला अभिषेक, पुजा करत राहणं म्हणजे अध्यात्म हा विचार चुकीचा आहे असं मलाही वाटत आलंय. त्याऐवजी कुटुंबासाठी, समाजासाठी कष्ट घेणं, त्यासाठी स्वतःला वाहून घेणं हे विचार पटण्यासारखे आहेत. लेखिकेने बाबा आमटेंचं उदाहरण दिलं आहे. बाबांनी कुष्ठरोग्यांमध्येच देव पाहिला. देशात असे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत ज्यांनी समाजालाच देव मानून त्याची सेवा केली आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे". हेही एक प्रकारचं अध्यात्मच आहे. अशा अध्यात्मिक लोकांमुळेच समाज आणि देश तरुन जातो हे नक्की.

लेखमालेतला शेवटचा लेख "पुरुषाला मैत्रीण का लागते " हा एक वेगळ्या प्रकारचा लेख आहे आणि तो आजच्या काळाला सर्वार्थाने लागू होतो. खरं तर बायकोसारखी उत्कृष्ट मैत्रीण दुसरी नाही. पण विचार, आवडीनिवडी, संस्कार यातील अंतरामुळे नवराबायकोत मतभेद निर्माण होतात आणि मग बायको ही मैत्रीण न राहता बायकोच राहते. हे असं होऊ नये म्हणून काय करायला हवं यासंदर्भातील विचार लेखिकेने मांडले आहेत ते नक्कीच अनुसरणीय आहेत.

एकंदरीत " गुंफियेला शेला " ही विचारांची आणि व्यक्तिमत्वांची सुरेख गुंफण आहे. लेखिकेचं हे तिसरं पुस्तक. त्यांचं वय विचारात घेता लिखाणातला त्यांचा उत्साह खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. अजून त्यांची किमान तीन तरी पुस्तकं व्हावीत याबद्दल त्यांना खुप खुप शुभेच्छा.

**दीपक तांबोळी**

**(साहित्यिक)**

**Deepak Madhukar Tamboli**

**Union Bank Of India**

**Sindhi colony branch,Jalgaon**

**9503011250**

## आभार

लेखक श्री. दिपक तांबोळी यांची हार ही कथा वॉट्सऍपवर आली होती. ती मला आवडली म्हणून मी त्यांना फोनवर तसे सांगितले व त्यांची इतर कथांची पुस्तके मागवली. त्यामुळे लेखक म्हणून त्यांचा परिचय झाला.

माझी पण दोन पुस्तके त्यांना आवडल्याचे त्यांनी कळविले. म्हणून माझ्या तिसऱ्या पुस्तकास प्रस्तावना द्याल कां? हे मी त्यांना विचारले. सर खूप सुस्वभावी व वास्तवात वावरणारे आहेत. त्यांनी लगेचच प्रस्तावना देण्याचे मान्य केले. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. ई साहित्यचे प्रकाशक श्री. सुनीळ सामंत यांचीही मी खूप आभारी आहे..

# अर्पण पत्रिका

ज्यांच्या बरोबर
मी ५० वर्षांचे सहजीवन अतिशय आनंदाने जगले
ते माझे पती




**कै. सतीश पटवर्धन**
यांच्या पवित्र स्मृतीस
हा स्मृतींचा शेला अर्पण करीत आहे.

# अनुक्रमणिका


1 द. गो. बर्वे एक साहित्यिक

2 विजयराव आठवले

3 अनिल रुईकर सर

4 स्मिता दीक्षित

5 गुरुकृपा सामाजिक संस्था

6 स्वातंत्र्याचा पाईक कै. रामचंद्र करकरे

7 माझे गुरू श्री पाटील महाराज

8 माझा भाऊ शाम

9 माहेरवाशीण

10 एक सच्चा सामाजिक भान असणारा माणूस

11 संगीत प्रेमी श्री कालगावकर सर

12 सावरकरांची मार्सेलिस उडी

13 गोरज

14 प्रसाद

15 टाळी

16 एकेकाचे अध्यात्म

17 पुरुषाला मैत्रीण का लागते

# द. गो. बर्वे एक साहित्यिक

खरंतर लेखकांची ओळख त्यांच्या पुस्तकामुळेच होते. तसा श्री. राजीव बर्वे यांच्याशी माझा परिचय त्यांच्या पुस्तकामुळेच झाला. त्यांचे "मला भेटलेली माणसे" हे पुस्तक म्हणजे त्यांना भेटलेली अगदी वेगळया व्यक्तीमत्त्वाची माणसं. हे पुस्तक मी वाचलं आणि त्याचवेळी गणेशवाडी येथील लोकसेवा संघ वाचनालयाचा शतक महोत्सव साजरा करण्याचे ठरत होते. या वाचनालयाशी आमचा अतिशय जवळचा संबंध होता.  वाचनालयाच्या पुस्तक निवड समितीवर माझेच मिस्टर होते. त्यामुळे आम्हाला उत्तम पुस्तके नेहमीच वाचायला मिळायची. या वाचनालयाच्या शंभराव्या वाढदिवसानिमित्त काही लेखकांची व्याख्याने आयोजित करण्याचे ठरले. त्यातील दोन-तीन लेखकांची व्याख्याने मी आयोजित केली. त्यातील एक राजीव बर्वे यांचे पुस्तक वाचल्यावर मी त्यांना फोन केला व पुस्तक आवडल्याचे सांगितले व लोकसेवा संघ वाचनालयात व्याख्यानासाठी याल का असे विचारले. विशेष म्हणजे कुठलेही आढेवेढे न घेता त्यांनी लगेच होकार दिला. व पुढे काही ना काही कारणाने त्यांच्याशी अधिक परिचय झाला. दुसऱ्याला समजून घेणारा एक उत्तम माणूस असे आहेत बर्वे सर!

नंतर मला त्यांच्या वडिलांबद्दलही खूप माहिती कळली. यांचा जन्म 21 ऑगस्ट 1917 साली बेळगाव येथे झाला. ते बी. ए. एम.ए. पुण्याच्या फर्ग्युसन

कॉलेजमध्ये व पुणे विद्यापीठात झाले. नामवंत शिक्षक म्हणून त्यांनी नाव कमावले. ते एक व्यासंगी प्राध्यापक होते. इंग्रजी व मराठी दोनहिवर त्यांचे प्रभुत्व होते. यांना घरी सगळे भाऊ म्हणायचे. श्री. राजीव बर्वे जेव्हा 18 -19 वर्षांचे झाले तेव्हा त्यांना वडिलांचे दुःख काय असते ते कळू लागले. भाऊंनी तासगाव, कोल्हापूर, बेळगाव इकडे प्राध्यापक म्हणून काम केले. ते विद्यार्थी प्रिय होते. पैसा मिळविणे, चैन करणे या गोष्टी त्यांनी कधीच केल्या नाहीत. त्यांनी स्वतःला लेखन व साहित्य याला वाहून घेतलं. लेखनाची सुरुवात त्यांनी बालवाङ्मयाने केली. तसेच यांनी बालवाङ्मयाचे लेखकहि शोधून काढले. दत्ता टोळ, सुभाषचंद्र वैष्णव आणि देवपूरकर हे बालवाङ्मयाचे लेखक म्हणून यांना मार्गदर्शन करून श्री. बर्वे सरांनी त्यांना लिहिते केले. त्यांचे हे मोठे योगदान. त्यांनी मग स्वतःचीच प्रकाशन संस्था काढली. आपल्याच मुलीचे छान- छान नाटुकली हे पुस्तक प्रसिद्ध केले. दिलीपराज प्रकाशन ही छोटीशी संस्था भाड्याच्या जागेत सुरू केली. त्यांच्या पुट्टी, पोकळी आणि पंचवेडी यातून त्यांचा प्रेमळपणा दिसून येतो. बालकांसाठी ही त्यांनी पुस्तके लिहिली. मुलांना आवडणारे विषय परी, राक्षस, जादू या विषयावरती! मुलांबद्दल त्यांना खूप तळमळ व प्रेम होते. त्यांना वाचतांना आनंद वाटेल अशाच विषयावरच्या गोष्टी त्यांनी लिहिल्या.

वडिलांची स्मृती जपायची म्हणून श्री. राजीव बर्वे हे आजही दिलीपराज प्रकाशनच्या वतीने छोटी- छोटी गोष्टींची पुस्तके प्रकाशित करतात. बालवाङ्मयाची वडिलांनी लावलेली ज्योत अखंड तेवत ठेवण्याचा त्यांचा हा एक प्रयत्न!

श्री. द. गो. बर्वे यांचे सहजीवनही चांगले होते. त्यांच्या पत्नी मालती बर्वे यांनीहि एक शाळा काढली होती. व त्या शाळेत त्यांनी मुख्याध्यापिका म्हणूनही काम केले.

महत्त्वाचे म्हणजे श्री. द. गो. बर्वे हे दुसऱ्यांना समजून घेणारे होते. आजच्या काळात उत्तम माणूस अभावाने आढळतो. शिक्षकी पेशामध्ये असतांना पात्र असूनही त्यांना प्राचार्यपद मिळाले नाही. पण त्यासाठी ते भांडत बसले नाहीत. तर स्वतःला अतिशय प्रिय असलेल्या लेखनाकडे ते वळले. स्वतःची प्रकाशन संस्था काढणे सोपे काम नाही. त्यामुळे साहित्य क्षेत्रात त्यांनी उत्तम नाव मिळविले. पैशाला त्यांनी आपल्या आयुष्यात फारसे महत्त्व दिले नाही.

श्री. भाऊंचे हे सगळे गुण त्यांचे चिरंजीव श्री. राजीव बर्वे यांच्यात उतरले आहेत.

वडिलांनी सुरू केलेले प्रकाशन संस्थेचे मुलाने वटवृक्षात रुपांतर केले. शिवाय वडिलांप्रमाणे स्वतःही उत्तम लेखन करून पुस्तके काढली. अशा रूपाने वडिलांचे ऋण फेडणारी मुले विरळच!

या लेखाच्या निमित्ताने श्री. राजीव बर्वे यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा! कितीही मोठे प्रकाशक, लेखक झालात तरी जमिनीवरच रहा व तेथील माणसांवर प्रेम करा. त्यांच्या प्रती माझ्या मनात जो स्नेहभाव आहे त्यामुळे हे सांगणे!

# श्री. विजयराव आठवले

श्री. विजयराव आठवले हे आमचे व्याही होणार यावर शिक्कामोर्तब झाल्यावर ते पत्नी व मुलासह कागवाडला आमच्या घरी आले. साहजिकच गप्पांमधून त्यांची अधिक ओळख झाली. ते C.A. व ICWA झाले असून पुण्यात व्यवसाय करतात. C.A. झाल्यावर त्यांनी जरी प्रॅक्टिस सुरू केली तरी त्यांनी लवकरच आपल्या कंपनीचे रूपांतर सॉफ्टवेअर कंपनीत केले. जिचे नाव त्यांनी Alpha Data Systems असे वेगळे ठेवले व ते पुण्यातील पहिले असे C.A. की ज्यांनी आपला व्यवसाय सॉफ्टवेअरमध्ये बदलला.

शिकत असतांना त्यांनी आपला अभ्यास कशा प्रकारे केला हे विद्यार्थ्यांना खूपच मार्गदर्शक आहे. आणि म्हणून मी त्यांच्या या आगळयावेगळया अभ्यास पद्धतीवर लिहायचे ठरविले. त्यांचे वडील कॅप्टन असल्यामुळे त्यांच्या सतत बदल्या व्हायच्या. विजयराव आधी मुंबई नंतर दिल्ली व लखनऊला आपल्या आई-वडिलांबरोबर राहिले. शाळेत जाण्यासाठी त्यांनी आपल्या आई-वडिलांना खूपच त्रास दिला. त्यांना अभ्यास करणे आवडायचे नाही. जेव्हा ते पालकांसोबत नागपूरला होते. त्यावेळी तेथील केंद्रिय विद्यालयात नाव दाखल केले. वडिलांच्या बदलीमुळे त्यांना दर दोन-तीन वर्षांनी गाव बदलावे लागायचे. त्यामुळे नवीन शाळा, नवीन परिसर, नवीन मित्र मिळायचे. त्यामुळे विजयारावांना भारतातील अनेक शहरे पहायला मिळाली. मिरतमध्ये असतांना त्यांनी चौथी, पाचवी व सहावीयत्ता पूर्ण

केली. मीरत हे छोटेसेच आजूबाजूला हिरवाई व जंगल असलेले गाव. त्यामुळे मित्रांसोबत ते आई-वडिलांना न सांगता जंगलात जायचे. सर्व मित्रांजवळ Air Gun होत्या. यांच्या जवळच फक्त नव्हती.

सहाव्या इयत्तेपर्यंत त्यांना कधीच 50 टक्क्यांच्या वर मार्क्स मिळाले नव्हते. त्यामुळे जेव्हा यांनी वडिलांकडे Air Gun ची मागणी केली त्यावेळी वडिल म्हणाले माझी पण तुझ्याकडे एक मागणी आहे. ती तू पूर्ण केलीस तर तुला Air Gun मिळेल. वडील म्हणाले तू सहाव्या इयत्तेत पहिला नंबर मिळवून दाखव. मुळात विजयना अभ्यास करणे हे मनापासून आवडत नव्हते. पण Air Gun मिळवायची तर पहिला नंबर मिळवायला हवा. त्यांनी 1, 2, 3 नंबर असलेली मुले कसा अभ्यास करतात हे पाहिले. त्याचे मानसशास्त्र समजून घेतले. त्यांना तर खूप तास अभ्यास करणे हे मान्य नव्हते. त्यामुळे कमी वेळ अभ्यास करून जास्तीत जास्त मार्क्स कसे मिळतील याकडे त्यांनी आपला फोकस ठेवला.

धड्यावरती अगदी छोट्या छोट्या नोट्स काढायचे ठरविले. की ज्या सहज लक्षात राहू शकतील. त्यांनी विचारपूर्वक अभ्यासाची दिशा बदलली व वडिलांनी घातलेल्या अटींमध्ये ते उत्तीर्ण झाले. त्यांनी सहावीत पहिला नंबर मिळवला. आजच्या 90% मार्कांपेक्षाही तेव्हाचे 60 टक्के मार्क्स मिळवणे हे खूप महत्त्वाचे होते. आणि विशेष म्हणजे अभ्यास समजून घेणे ह्याला त्यांनी खूप महत्त्व दिले. त्यामुळे ते Air Gun वडिलांकडून बक्षीस मिळवू शकले.

पण त्यांची ही अभ्यास करण्याची पद्धत काय होती ते आपण पाहणार आहोत.

वडिलांकडून Air Gun मिळाल्यावर त्यांना इतका आनंद झाला की जेवढा आनंद सचिन तेंडुलकर यांना वर्ल्डकप मिळाल्यावर झाला असेल.

वडिलांच्या सततच्या बदल्यामुळे वडिलांनी त्यांना पुण्याला पुढील शिक्षणासाठी हॉस्टेलवर ठेवले.

दहावीला शिकत असतांना परीक्षेच्या एक महिना अगोदर ते एकदा एका मोठ्या पिंपळवृक्षाखाली बसले होते. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच ते झाड होते. आपला मधल्या सुट्टीतला डबा घेऊन तेथे खायला बसले. काही मुले समोरच खेळत होती. तेवढ्यात एक मुलगी खेळता खेळता पडली व पुन्हा झटकन उठली आणि क्षणभर थांबून पुन्हा खेळू लागली. विजयही आपल्याशीच हसले व त्यांना वाटले ही पुढे जाऊन इंदिरा गांधी होईल. एक मुलगा क्रिकेट खेळत होता त्यांना वाटले तो पुढे जाऊन गावस्कर होईल. अरे पण आपले काय? त्याक्षणी त्यांनी आपले नोटबुक उघडले व पेन घेतले व झाडाखाली बसून आपण आपल्या आयुष्याकडे काय मागू शकतो ते लिहू लागले. त्यांनी पंधरा-वीस मुद्दे लिहिले. त्यांच्या आयुष्यात पुढे घडाव्यात अशा घटनाबद्दल त्याच्यात शिक्षण, आपले कुटुंब वगैरे खालील मुद्दे त्यांनी लिहून काढले.

- अशा मुलीशी मी लग्न करीन की जीचे डोळे सुंदर असतील. कारण त्यांना आपल्या चष्म्याचा वैताग आला होता.
- मी निवडलेल्या क्षेत्रांमध्ये मी द्विपदवीधर होईन.
- मला दोन मुले असतील.
- माझी महत्त्वाच्या वर्तमानपत्रांमध्ये मुलाखत छापून येईल.

- मासीके, रेडिओ व टीव्हीवर सुद्धा माझी मुलाखत येईल.
- मी लक्षावधी होईन. (त्यावेळी त्यालाही खूप महत्त्व होते.)
- मी सहा वेळा तरी परदेश वाऱ्या करेन.
- माझ्याजवळ दोन गाड्या असतील.
- माझा स्वतःचा व्यवसाय असेल.

आणि खरोखर या सर्व गोष्टी त्यांच्या पुढील जीवनात पूर्ण झाल्या. दहावीच्या विद्यार्थ्याने आपल्या आयुष्याचा विचार इतका गांभीर्याने करावा हे खरोखर कौतुकास्पद आहे.

पुण्याच्या वाडिया कॉलेजमधून त्यांनी आपले कॉमर्सचे शिक्षण पूर्ण केले व पहिल्या झटक्यात C.A. व I CWA उत्तीर्ण झाले. पण या प्रत्येक वेळी त्यांनी कमी वेळ अभ्यास पण उत्तम रिझल्ट हीच पद्धत अवलंबली.

योग्य वेळी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुलगे झाले. दहावी संपताना त्यांनी पुढील आयुष्यामध्ये काय काय व्हायला हवे हे मुद्दे लिहिलेले. त्याप्रमाणे ते पूर्ण झाले. C.A. झाल्यावर त्यांनी आपला व्यवसाय सुरू केला. त्यावेळी अचानक त्यांचा एक Client स्वर्गवासी झाला आणि त्याच्या कुटुंबीयांना त्याने केलेले आर्थिक नियोजन काहीच माहित नव्हते. याचे श्री. विजय यांना खूप आश्चर्य वाटले आणि या घटनेमुळे विजयने शोध सुरू केला. प्रत्येकाने वैयक्तिक पैसा शिल्लक कसा टाकला आहे याचा. त्यांना असे आढळून आले, खूप मध्यमवर्गीयांना आपल्या

घरातील मिळवता कुटुंब प्रमुखाचा आर्थिक व्यवहार माहीत नसतोच. त्यामुळे कुटुंब प्रमुखाच्या निधनानंतर पत्नी अगर मुलाला इकडून तिकडे अशी खूप धावपळ करावी लागते. हा व्यवहार काय होता ते समजावून घ्यायला. एका मध्यमवर्गीयांचा इन्शुरन्स बँक अकाउंट, Mutual Fund, F.D. अशा विविध प्रकारात गुंतवणूक असू शकते. त्याचे ATM असल्यास त्याचा पासवर्ड इत्यादी अचानक या गोष्टी इतर कुटुंबियांना समजून घेणे अवघड जाते. म्हणून विजयरावांनी ठरविले की आपण असे सॉफ्टवेअर तयार करायचे की ज्यामध्ये व्यक्तीचा आर्थिक व्यवहार, गुंतवणूक सर्व माहिती एकत्र सापडेल. ती सर्व एका पेनड्राईव्हमध्ये साठवता येईल. त्याला त्यांनी नाव दिले VAULT. त्यांनी Press Conference घेऊन सर्व वर्तमानपत्रात या प्रोडक्टची माहिती दिली. आणि विविध ठिकाणच्या तीन हजार लोकांना या कॉपीज विकल्या. दुबई व अबूधाबियांनाहि त्यांनी आपले हे प्रोडक्ट विकले. आजहि हे प्रॉडक्ट मार्केटमध्ये विकण्यासाठी उपलब्ध आहे. अनेक C.A. झालेल्या विद्यार्थ्यांनी विजयना सांगितलं की अभ्यास कसा करावा याचा ढाचा जो त्यांनी तयार केला आहे. त्याचा उपयोग करून विद्यार्थी उत्तम रितीने ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

पुष्कळ विद्यार्थ्यांना अभ्यास कशा पद्धतीने करावा हे माहीत नसते. पुष्कळ विद्यार्थी अभ्यास पुष्कळ तास करतात. पण त्यांचा रिझल्ट मात्र उत्तम येत नाही. यांनी असं निरीक्षण केलं की विद्यार्थी परीक्षेत नापास होत नाहीत तर ते अभ्यास तयार करण्यात नापास होतात. आणि म्हणून विजयराव तज्ज्ञ डॉक्टरांना भेटले. मेंदू कुठलीही गोष्ट कशाप्रकारे आकलन करतो व ती कशी अमलात येते. याचा त्यांनी शोध घेऊन तज्ज्ञ प्रोफेसरांना भेटले. व शेवटी यांनी एक Power Study संशोधन तयार केलं. त्याला नाव दिलं Power Study. यामुळे विद्यार्थी आपली आकलन

शक्ती वाढवू शकतो. वाचन भरभर कसं करावं ही पद्धत यांनी स्वतःहि अनुसरली व एक Study Plan तयार केला. यामुळे विद्यार्थी आपल्या अभ्यासाचे नियोजन त्वरित करू शकेल. लवकरच विजयराव हा Study Plan तयार करू लागले. जो इयत्ता सहावीमध्ये असतांना त्यांनी Air Gun मिळवण्यासाठी केला होता. आणि खरोखर आनंदाची वार्ता अशी की त्यांनी हा Study Plan कार्यान्वित आणला व 1000 चे वर विद्यार्थ्यांनी तो Download केला. हा सॉफ्टवेअर त्यांनी बनवला. हा ॲप विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारतो आणि मग विद्यार्थ्यांच्या त्या उत्तरावरून तो ॲप विद्यार्थ्यांसाठी प्लॅन तयार करतो. कारण प्रत्येक विद्यार्थ्यांची कुवत, बुद्धी आवड वेगळी असते. विद्यार्थ्यांचा शालेय अभ्यासक्रम या App ला जोडलेला असतो. त्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या अभ्यासक्रमात उत्तम गती मिळते. त्यांनी 10 वी C.A. व ICSE C.S. Examination याचा App तयार केला. हा मोबाईलवर आणायला त्यांना तीन वर्षांचा कालावधी लागला.

# अनिल रुईकर सर

रुईकर सरांचा व माझा परिचय माझ्या भावामुळे झाला. दोघेही विश्रामबाग (सांगली) येथील गव्हर्मेंट कॉलनीत राहतात.  खरंतर गव्हर्मेंट कॉलनी खूपच मोठी आहे.  व्यक्ती त्याच्या कार्यामुळे सर्वांनाच परिचित होते. रुईकर सरांचे तसेच. बँकेत नोकरी करणारे पण नुसती नोकरी करत जगणे त्यांना पसंत नव्हते. ते 2001 साली या कॉलनीत कुटुंबासमवेत रहायला आले. त्यावेळी स्वेच्छा निवृत्तीची योजना बँकेकडून आली आणि सरांनी निवृत्ती घेतली. याआधी सरांच्या अनेक ठिकाणी बदल्या झाल्या होत्या. ते पंढरपूरलाही होते.  तेथे असतांना त्यांनी संध्याकाळच्या वेळी छोटासा संस्कार वर्ग सुरू केला. सुरुवातीला चार ते पाच मुलेच यायची पण हळूहळू संस्कार वर्गाला येणाऱ्या मुलांची संख्या वाढू लागली. सर मुलांना श्लोक, रामरक्षा, काही स्तोत्रे शिकवू लागले. पांडुरंगाच्या आशीर्वादाने वर्गातील मुलांवर चांगले संस्कार होऊ लागले. लहान वयात चांगले संस्कार झाले की ही मुले पुढे जाऊन देशाचे उत्तम नागरिक बनतील ही सरांना असलेली खात्री!

पुढे सरांची बदली गुजरातला झाली. येथेहि सरांनी आपला संस्कारवर्ग चालूच ठेवला. पोटापाण्याचा उद्योग सांभाळून दुसऱ्यासाठी काहीतरी करावे ही तळमळ ज्याला असते ना तो नक्कीच समाजासाठी आवश्यक असे कार्य करतो. त्याच्या या कामामुळे त्याच्या पश्चातही त्याची ओळख पुढील पिढीलाही राहते.

आला- आला प्राणी जन्मासि आला

गेला- गेला प्राणी मरोनी गेला!!

असे त्यांचे नसते.

रुईकरसर पण असे आगळे- वेगळे व्यक्तिमत्व असलेले. त्यांनी अख्खी पिढी सुसंस्कारित घडवली.

2001 साली निवृत्तीनंतर विश्रामबाग येथे सरांनी गीता पाठांतराचे वर्ग सुरू केले. तत्पूर्वी त्यांनी व त्यांच्या पत्नीने 18 अध्याय गीता पाठांतर केले. स्वतः उत्तम पाठ केल्यावर त्यांनी हे वर्ग सुरू केले.

सुरुवातीला शाळेत जाणारी मुले वर्गाला येऊ लागली. मग त्यांच्या आयाहि येऊ लागल्या. एवढेच नव्हे तर कधीही न शिकलेल्या बायका, मुले या वर्गाला येऊ लागली. उषा रावणरंग ही अशीच एक धुणे- भांडी करणारी स्त्री. तिचा मुलगा शाळेला जाणारा. तो या वर्गाला जात होता. त्या मुलाने पाठ केलेले अध्याय आपल्याला घरी त्याच्याकडून म्हणवून घेता यावा म्हणून ती या वर्गाला जाऊ लागली. सरांच्या या वर्गाचे यश याहून दुसरे काय सांगणार? अशिक्षितसुद्धा गीता पाठांतर वर्गाला यायला लागले. म्हणजे सरांचे हे काम सगळ्यांना आवडले व त्यांना वर्गाला जाण्याची ओढ वाटायला लागली! मला तरी हे सर्व ऐकून सरांचे किती कौतुक करू त्यांना किती धन्यवाद देऊ असे झाले.

शृंगेरी येथे आदरणीय शंकराचार्यांच्या मठात दरवर्षी गीता पाठांतर स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेसाठी सरांच्या वर्गातील 96 मुले स्त्रिया यांनी जाऊन 18 ही

अध्याय पाठ म्हणून प्रत्येकी 25000 चे बक्षीस मिळवून आणले. उषा रावणरंग सारख्या निरक्षर स्त्रियाहि यात आहेत.

सर नुसते गीता पाठांतर घेत नाहीत तर काही अध्यायांचा अर्थहि मुलांना समजेल अशा शब्दात सांगतात. एवढेच नव्हे तर मुलांनी व पालकांनी गीता नुसते पाठ न करता ती आत्मसात करावी म्हणून ते वर्गात गीतेवर वेगवेगळया स्पर्धा घेतात. उदाहरणार्थ ते असे प्रश्न विचारतात की बाराव्या अध्यायातून मला काय समजले थोडक्यात सांगा. आपले विचार सर्वांसमोर उभारून सांगण्याची संधी ते या मुलांना देतात. त्यामुळे मुले व पालक गीतेतील श्लोकांच्या अर्थाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला लागले आहेत. सर्वांचेवर असा गीतेचा संस्कार होणे किती महत्त्वाचे आहे नां! त्यामुळे विद्यार्थ्यांचे जीवन उजळून निघेल. खरोखर सरांनी गव्हर्मेंट कॉलनीतील शालेय मुलांची पिढी उत्तम संस्काराने घडविली आहे. त्यांच्या या गीता वर्गामुळे गव्हर्मेंट कॉलनीतील वातावरणही खूपच बदलले आहे. सरांसारखे लोक समाजात आहेत म्हणून थोडी- फार नैतिकता समाजात टिकून आहे.

संस्कार नसल्यामुळे मुले कशी बहकल्यासारखी वागतात हे आपण सध्या समाजात पाहतो आहोत. क्रुझवरील रेव्हपार्ट्या हे कशाचे द्योतक आहे! न्याय- अन्याय, नीती- अनिती याची चाड राहिलेली दिसत नाही. यामुळे मन विषण्ण होते. सामान्य माणूस हे सर्व पाहून हतबल होतो. पण पुन्हा रुईकर सरांसारखे मुलांवर संस्कार व्हावेत म्हणून धडपडणारी माणसे पाहिली की त्यांचे काम मनाला दिलासा देते. त्यांचे काम म्हणजे एक ओयासिस!

गीता अध्याय पाठांतरामुळे मुलांवर, पालकांचेवर सुद्धा कर्मयोगाचा संस्कार होतो. लहान वयात कर्मयोग मनावर ठसला म्हणजे व्यक्ती विहित कर्म निश्चितच उत्तम तऱ्हेने करू शकते. व त्यामुळे ती व्यक्ती आयुष्यात सर्वच दृष्टीने सुखी होते. स्वार्थ, मी पणा नाहीसा होतोच पण दुसऱ्याचे दुःख पाहून ते दूर करण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला जातो.

सर गीता पाठांतर एवढ्यावरच थांबले नाहीत तर स्वयंशिस्त, परिसराची स्वच्छता, स्वावलंबन या गोष्टी ते मुलांना शिकवतात. पर्यावरणाबद्दल तर आपण पुष्कळ ऐकतो, वाचतो. पण सरांनी केलेले संस्कार मुलांचेवर इतक्या चांगल्या तऱ्हेने रुजला आहे. त्याचे एक उदाहरण म्हणजे सरांच्या या वर्गाला येणारी ही मुले वेगवेगळया शाळेत जाणारी असतात.  एकदा एका शाळेचे गॅदरिंग होते. मुलांना खाऊचे वाटप केले होते. खाऊ खाऊन झाल्यावर जवळजवळ सगळया मुलांनी खाऊ घालून दिलेले कागद पटांगणातच चुरगळून टाकून दिले होते. शाळा सुटल्यावर मुले घरी गेली. पण एक मुलगी घरी न जाता पटांगणातील चुरगळलेले कागद गोळा करायला लागली.  एक शिक्षक हे सर्व पहात होते.  ते त्या मुली जवळ गेले व म्हणाले तू काय हे कागद गोळा करते आहेस? ती मुलगी म्हणाली मी रुईकर सरांच्या गुरुकुल वर्गाला जाते. तेथे सरांनी आम्हाला शिकवले आहे की आपण सार्वजनिक स्वच्छता पाळली पाहिजे.  स्वतःची स्वच्छता, घराची स्वच्छता तसेच आजूबाजूची स्वच्छता का व कशी करायची हे सर्व सर आम्हाला समजून सांगतात. त्यामुळे मी हे पटांगणातील कागद कचरापेटीत टाकते आहे. सरांनी केलेल्या संस्काराचा उत्तम परिणाम याचे हे बोलके उदाहरण आहे.

ह्या दोन वर्षात करोना आला आणि सर्वच लोक हवालदील झाले! पण या काळात सुद्धा सरांनी मुलांच्यावर संकटकाळी एकमेकांना मदत करावी हा संस्कार केला. त्याचे असे झाले करोनामुळे बऱ्याच लोकांना आर्थिक फटका बसला. सर म्हणाले आपण सर्वजण मिळून या आर्थिक अडचणीत सापडलेल्या गरीबांना मदत करू. एका मुलाने तर स्वत:ला मिळालेली बक्षिसाची रक्कम, तसेच नातेवाईकांचेकडून मिळालेले खाऊसाठीचे पैसे सायकल घेण्यासाठी साठवलेले होते. तो मुलगा सरांना म्हणाला मी सायकल घेण्यासाठी पैसे साठवले आहेत, पण मी आता सायकल घेणार नाही. ते पैसे मी तुमच्याकडे देतो. तुम्ही आर्थिक अडचणीत सापडलेल्यांना जी मदत देणार आहात त्यात माझे हे पैसे जमा करा. या मुलांवर झालेला गीतेचा संस्कार आपल्याला पुष्कळ काही सांगून जातो.

श्री. रूईकर सर विश्रामबाग गव्हर्मेंट कॉलनीत असणाऱ्या वृद्धाश्रमाचेहि एक विश्वस्त आहेत. तेथील वृद्धांनाही सर रामरक्षा, मनाचे श्लोक सांगायला जातात. वृद्धांचा वेळ आनंदात जावा असे सरांना मनापासून वाटते. म्हणजे मुले, पालक व वृद्ध अशा तीनही गटांसाठी सर काम करतात. असे कार्य करीत असलेल्या रूईकर सरांना शारिरिक, मानसिक बळ लाभावे हीच परमेश्र्वराजवळ प्रार्थना!

# स्मिता दीक्षित जिज्ञासा मतिमंद शाळेच्या संस्थापिका.

माझ्या सामाजिक कामामुळे श्रीमती स्मिता दीक्षित यांच्याशी माझा परिचय झाला. मी त्यांच्या शाळेतही दोन वेळा गेले. त्या जिज्ञासा या मतिमंदासाठी कार्यरत संस्थेची संस्थापिका आहेत. शिवाय 1992 पासून या शाळेत त्या मुख्याध्यापिका म्हणून कामही करतात.

त्यापूर्वी त्या बालवाडी शिक्षिका म्हणून काम करत असतांना वेगळे काहीतरी करावे या विचाराने त्यांनी कोल्हापूरमध्ये असलेल्याच मतिमंद मुलांच्या शाळेत शिक्षिकेची तेथे गरज होती म्हणून नोकरी स्वीकारली. ज्याला खरी सामाजिक कामाची ओढ, तळमळ असते तीच व्यक्ती असे काम करू शकते. या मतिमंद मुलांच्या शाळेत काम करत असतांना वेगवेगळया पातळीतील मतिमंद मुलांना एकसारखे लेखन-वाचन आणि कार्य शिक्षण देण्यापेक्षा, प्रत्येकाकडे काही ना काही क्षमता असते आणि तिला योग्य संधी मिळाली तर त्यांचा चांगला विकास होतो म्हणूनच त्यांच्याकडे असलेल्या क्षमता त्यांना पूर्णपणे वापरावयास शिकविणे त्यांना महत्त्वाचे वाटल्याने त्यांनी 1992 मध्ये स्वतःची संस्था जिज्ञासा सुरू केली. पहिल्यांदा जेव्हा त्यांनी बालवाडी सोडून मतिमंद मुलांच्या शाळेत नोकरी करण्याचे ठरविले त्यावेळी अशा विशेष मुलांच्या शाळेत नोकरी करण्यासाठी आवश्यक

असणारा डी. टी. एम. आर. हा डिप्लोमा त्यांनी पूर्ण केला. त्या B.Com., MSW (Medi Psy) (Community Der. P.) आहेतच. खरं तर या शिक्षणावर त्यांना कुठेही उत्तम नोकरी मिळू शकली असती. पण तसे न करता दिव्यांग मुलांसाठी काम करावे यासाठी विशिष्ट मनोवृत्ती. प्रबल इच्छा, उत्तम ध्येय लागते ते त्यांच्याजवळ निश्चितच असल्यामुळे त्या अशा शाळेची स्थापना करू शकल्या. अशा मुलांची शाळा स्वतः सुरू करणे हे येरा गबाळ्याचे काम नाही. त्यासाठी विलक्षण मेहनत आवश्यकच आहे. शिवाय आर्थिक बळ हवे.

सुरुवातीला दोन विद्यार्थ्यांना घेऊन सुरू केलेली शाळा पालकांना एक प्रयोग वाटली. ना जाहिरात ना कोणा मातब्बरांचा पाठिंबा! ही शाळा म्हणून उभी राहील का? याला शाळेचे स्वरूप येईल का? अशी शाळा किती दिवस चालेल? असे अनेक प्रश्न पालकांना पडले. पण प्रथम पासूनच 2 - 4 विद्यार्थ्यांसाठी देखील टाईम टेबल आखणे, वयोगट, क्षमता यांचा विचार करून तयार केलेला शैक्षणिक कार्यक्रम, सहल, स्पर्धा, खेळ पालकसंवाद या सर्व आयोजनामुळे पालकांमध्ये बाईंच्या शाळेबद्दल विश्वास निर्माण झाला. मुलांची संख्याही वाढली.

यानंतर त्यांनी शामकमल चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना 2000 साली केली. या ट्रस्टचे वतीने विविध उपक्रम राबवले. 1) राही पुनर्वसन केंद्र (प्रौढ बौद्धिक अक्षमांसाठी कार्यशाळा) 2) कमला केंद्र (महिला सक्षमीकरण केंद्र) 3) साद (Society for Ambitious, Aspiring, and Differently Abled)

राही पुनर्वसन केंद्र (प्रौढ बौद्धिक अक्षमांसाठी कार्यशाळा) समाज आणि कुटुंबांकडूनही दुर्लक्षित असणाऱ्या प्रौढ बौद्धिक अक्षमांना समाजाचा एक कृतिशील घटक बनविण्यासाठी या कार्यशाळेची सुरुवात 2002 साली करण्यात आली. आज या केंद्रात 75 प्रौढ बौद्धिक अक्षम विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून याकरिता 10 प्रशिक्षक कर्मचारी कार्यरत आहेत. सुरुवातीला हस्तकलांद्वारे विविध वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना देण्यात येत होते. यामधूनच विविध विभागांची सुरुवात झाली. यामध्ये प्रामुख्याने हस्तकला विभाग - यामध्ये शिल्लक कापडापासून चित्रमाळी बनविणे, वारली पेंटिंगचे वॉलपीस, हँगिंग यासारख्या वस्तू बनवितात. तसेच कुंदन पासून पणत्या, मोत्यांच्या राख्या, इमिटेशन ज्वेलरी यांची निर्मिती केली जाते. दिवाळी साहित्य बनवितांना पणत्या रंगविणे, मेण भरणे, उटणे बनविणे त्याचे पॅकिंग करणे. दिवाळी गिफ्ट बनवणे अशा अनेक गोष्टी मुलांकडून बनवून घेतल्या जातात.

फाईल मेकिंग व स्क्रीन पेन्टिंग - या विभागात ऑफिस फाइल्स, फोल्डर, बॉक्स फाइल्स, नोटबुक इत्यादींच्या निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते. बांबुकाम व सुतारकामही शिकविले जाते. बांबूकामात बनवणारे विविध आकारातील, पारंपारिक आकाशकंदील ही कार्यशाळेची विशेषता आहे.

क्रीडा विभाग - विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी देखील संस्था - खेळ, क्रीडा, योगासने याद्वारे विशेष प्रयत्नशील आहे. विविध जिल्हास्तर राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेबरोबरच विद्यार्थ्यांनी स्पेशल ऑलिंपिक्सच्या वर्ल्ड

गेम मधून ग्रीस, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अबुधाबी येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देखील सहभागी होऊन आज पर्यंत 4 सुवर्ण, 7 रौप्य व 4 कास्य पदके प्राप्त केली आहेत.

साद (Society for Ambitious, Aspiring, and Differently Abled) या उपक्रमांमध्ये बौद्धिक अक्षमाप्रमाणेच अन्य दिव्यांगांकरिता देखील एकत्रित व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा. क्रीडा कौशल्य वाढीस लागावे यासाठी याची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना या अंतर्गत स्केटिंग, सायकलिंग विविध खेळ व क्रीडा तसेच हस्तकाम, मातीकाम शिवणकाम अशा विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते.

विविध हस्तकलांमध्ये प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी राज्य स्तरावर तसेच राष्ट्रीय स्तरावर ऑलिम्पिक्स या विविध कौशल्य स्पर्धेत देखील सहभाग नोंदविला आहे.

हे सर्व दीक्षित बाईंचे काम पाहून त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच वाटते. 1992 साली ह्या जिज्ञासा शाळेची स्थापना केली. पण 2004 सालापर्यंत त्यांना सरकारी अनुदान मिळाले नाही. 8 वर्षे शिक्षकांनी केवळ महिना 200 रुपये पगारावर काम केले. केवढी समर्पण बुध्दी. 200 रुपये मासिक पगार व तोहि बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेत काम करण्यासाठी. अशा मुलांना नुसते सांभाळणे हेही एक दिव्यच

असते ते करून त्यांना विविध कला- कौशल्य शिकविणे यासाठी शिक्षकांच्या जवळ अफाट सहनशक्ती व या मुलांप्रती प्रेम असावे लागते. असे शिक्षक बाईंना शाळा चालविण्यासाठी लाभले हेही मोठे भाग्यच! जो कर्मयोग जाणतो, आत्मसात करतो त्यालाच असे निष्काम कर्म करणे शक्य आहे. 2002 सालापासून सरकारी अनुदान मिळाले व मग मात्र सर्वांनाच व्यवस्थित पगार मिळू लागले.

मला नेहमी एक खंत वाटते की जी मुले कला-क्रीडा यामध्ये निपुण आहेत. त्यांना अजूनहि पुढे जाण्यासाठी सरकार त्यांना पुरेशी कायमस्वरूपी स्कॉलरशिप का हो देत नाही? आज तर क्रिकेटसारख्या खेळावर सरकार करोडो रुपये खर्च करते आहे. मग अशा विशेष मुलांना पुढे येण्यासाठी सरकार पुरेशी आर्थिक मदत का नाही देत? शाळा हे काम आपल्या स्वबळावर कितीसे करू शकणार? एखादा मुलगा शाळेने पोहण्याच्या स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियाला पाठविला म्हणजे त्याला कितीसा मान, पैसा, प्रसिद्धी मिळणार? अशा क्रिडेत निपुण असलेल्या मुलांना निवडून त्यांना अशा प्रकारची संधी सरकारने वारंवार मिळवून द्यायला हवी. व त्यासाठी त्याला भरपूर मानधन द्यायला हवे. जेणेकरून तो पुढील आयुष्यात आई-वडिलांचेवर आर्थिक बोजा होणार नाही!

बाईंची ही जिज्ञासा शाळा ज्यांना शक्य आहे त्यांनी अवश्य पहावी. त्यांना शक्य ते सहकार्य करावे. त्यापासून आपल्यालाहि प्रेरणा मिळेल व आपल्या हातून दुसऱ्या काहीतरी समाजोपयोगी कामाची निर्मिती होईल.

गेली 20 वर्षे संस्थेचे वरील सर्व उपक्रम हे संस्थेच्या हितचिंतक देणगीदार यांच्या सहकार्यातुन चालू आहेत. राही कार्यशाळेसाठी स्वतःच्या मालकीची जमीन/ इमारत तसेच शासकीय अनुदानासाठी संस्था प्रयत्नशील आहे. संस्थेस प्राप्त होणाऱ्या देणग्या व कार्यशाळेत तयार होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीतून विविध खर्च केला जातो.

पत्ता- श्रीमती स्मिता दिक्षित.

जिज्ञासा विकास मंदिर रघुनंदन हॉल, मुशर चौक,

साने गुरुजी रोड, कोल्हापूर

9850060903

# गुरुकृपा सामाजिक संस्था

या संस्थेच्या पुणे कार्यवाह म्हणून  काम करणाऱ्या श्री. प्रशांत थोरात यांच्याशी माझा परिचय झाला. माझ्या 'कर्मयोगी' या पुस्तकातील काही लेख मराठी साहित्य परिषदेच्या ब्लॉगवर विश्व मराठी संमेलनाचे वेळी आले होते. ते लेख श्री. प्रशांत थोरात यांनी वाचले व लेख आवडले हे सांगण्यासाठी त्यांचा फोन आला. त्यांनी व्हॉट्सॲप सुरू केले व परिचय वाढला. मी कागवाड येथे गेली पस्तीस वर्षे विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. श्री. प्रशांत थोरात हे सामाजिक कामाची आवड असणारे आहेत. त्यामुळे ते करीत असलेले सामाजिक काम खूप भावले व त्यांच्या कामाची माहिती, त्यांची धडपड समाजासमोर यावी म्हणून मी गुरूकृपा संस्थेची माहिती लिहायचे ठरविले.

गुरुकृपा संस्था ही नोंदणीकृत संस्था आहे. 1994 मध्ये गुढीपाडव्याला गुरुकृपा संस्थेची स्थापना झाली. गेली सत्तावीस वर्षे 'वसुधैव कुटुम्बकम्' या वृत्तीने गुरुकृपा संस्था सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात सातत्याने कार्य करीत आहे. जगातला प्रत्येक माणूस आणि संपूर्ण निसर्ग यांच्याशी गुरुकृपा संस्था बंधुत्वाचे नाते जोपासते आहे. मानव समाजाचा सर्वांगीण विकास, दुःखाचे आमूलाग्र निराकरण आणि सुखाची सार्वत्रिक प्रस्थापना हाच गुरुकृपा संस्थेच्या उद्दिष्टांचा पाया आहे.

वयाच्या वेगवेगळया अवस्थांमध्ये व्यक्तीची वेगवेगळी गरज असते. सोबतच व्यक्तीने आपले जीवन निसर्गाला पूरक अशा पद्धतीने जगणे आवश्यक असते. या संस्थेने एक सप्तसूत्री ठरविली आहे. सुसंस्कृत बाल, सशक्त युवा, समाधानी वृद्ध, निरोगी मानव, मजबूत मन एकसंध समाज आणि समृद्ध पर्यावरण ही आहे.

संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष मा.श्री. पंकज नाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची निश्चित दिशेने वाटचाल चालू आहे.

लहान वयापासूनच मुलांचेवर उत्तम संस्कार व्हावेत यासाठी नानाविध प्रकल्प आणि उपक्रम संस्था राबवित आहे.

वेगवेगळया शाळांमधून प्रत्यक्ष जाऊन या कार्यकर्त्यांनी बोलणे कसे असावे? हे मुलांना सुभाषा अभियान या व्दारे शिकविले. मुले मित्रांशी बोलतांना सहजच शिव्यांचा वापर करतात असे करू नये हा बोध हे कार्यकर्ते देतात. लहान वयातच झालेले संस्कार आयुष्यभर उपयोगाचे ठरतात.

मुले आरोग्य संपन्न व्हावीत यासाठी प्रख्यात गिर्यारोहक श्री. विश्राम कुलकर्णी यांचेकडून त्यांनी केलेल्या गिर्यारोहणाच्या स्लाईडस मुलांना दाखवल्या. त्या स्लाईडस पाहतांना आपणच प्रत्यक्ष गिर्यारोहण करीत आहोत हा आनंद मुलांना झाला व एवढेच नव्हे तर त्यातील मुले सह्याद्रीच्या डोंगर कपाऱ्यावर जाण्यास उद्युक्त झाली.

गुरुकृपा राबवीत असलेले उपक्रम आधुनिक पिढीला अत्यंत उपयोगी असे आहेत. सैनिक आणि नागरिक यांच्यातील जवळीक वाढावी, सैनिकांच्या त्याग व

बलिदानाची जाणीव लहान वयातच मुलांना व्हावी. तसेच सैनिकामधील शिस्त बालक आणि पालक या दोघांनीहि आत्मसात करावी यासाठी आपला सैनिक, आपला व्हॅलेंटाईन डे ही कल्पना घेऊन हा उपक्रम राबविला जातो. जेणेकरून नागरिकांच्या मनात हे ठसावं की सैनिक हेच आपले खरे व्हॅलेंटाईन आहेत. जे आपल्यासाठी अक्षरशः जीव ओवाळून टाकतात. तसेच व्हॅलेंटाईन डे च्या नावाखाली चालणारे विपरीत प्रकार कमी व्हावेत हाहि एक उद्देश आहे.

संस्कृत भाषा ही अत्यंत समृद्ध भाषा आहे. तिची गोडी विद्यार्थी दशेपासूनच लागावी म्हणून हे कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

जुनी अर्थपूर्ण गाणी, शेरोशायरी आणि कविता यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा ‘हिम्मत का तराना’ हा गुरुकृपा संस्थेचा एक ठोस उपक्रम आहे. वृद्धाश्रमात जाऊन हा सादर केला जातो. जेणेकरून वृद्धांच्या मनातील नैराश्य व उदासीनतेचे मळभ दूर व्हावे.

या संस्थेचा एक आगळा- वेगळा कार्यक्रम म्हणजे लग्नानंतरची सप्तपदी. आज आपण पाहतो अनेक जोडप्यांची लग्नानंतर बारीक सारीक कारणांवरून भांडणे होतात व ती विकोपाला जाऊन घटस्फोटापर्यंत पाळी येते. त्यासाठी हे कार्यकर्ते सार्वजनिकरीत्या एक सेमिनार आयोजित करतात. जेणेकरून पती-पत्नीमधील जिव्हाळा कसा वाढावा व तो टिकवून ठेवावा याचे भारतीय संस्कृतीला अनुसरून मानसशास्त्रीय, वैद्यकीय, धार्मिक दृष्टिकोन व व्यावहारिक दृष्टीकोन ठेवून विवेचन केले जाते.

आजची वाढती व्यसने पाहता तंबाखू, दारू यापासून तरुणांनी दूर राहावे यासाठी शाळा कॉलेजमधून शॉर्ट सीडी मोफत दाखविल्या जातात.

वनौषधीवर गुरुकृपा दीर्घकाळापासून संशोधन करीत आहे. या संस्थेने अनेक छोट्या पुस्तिकाही प्रसिद्ध केल्या आहेत.

रक्तदान, नेत्रदान यासारखी शिबीरेहि संस्थेमार्फत आयोजित केली जातात.

अशी ही विविध सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था समाजातील प्रत्येकाने त्याला भरीव सहकार्य केले तर समाज सुसंस्कृत, निरोगी नक्कीच बनेल. तेव्हा अशा संस्थेला स्वतःचा वेळ, अनुभव, जागा किंवा आर्थिक सहाय्य अवश्य करावे असे मी मनापासून आवाहन करते.

श्री. प्रशांत थोरात यांचा मोबाईल नंबर 9921447007 आहे. त्यावर अवश्य संपर्क करावा. हे काम आपलेच आहे ही जाण ठेवावी म्हणजे गुरुकृपा संस्था आणखी उत्साहाने कार्य करू शकेल.

# स्वातंत्र्य पाईक कै.रामचंद्र करकरे

सौ. स्वाती वर्तक खार, मुंबई यांची व माझी मैत्री झाली ती त्यांनी माझे पुस्तक वाचल्यामुळे. समविचार, आवडी- निवडी एक असल्या, मने जुळली की मैत्री व्हायला वेळ लागत नाही. त्या मुंबईला मी कुठे कागवाडसारख्या खेडेगावात. वयातही दहा वर्षांचे अंतर. पण मैत्रीसाठी या कुठल्याच अंतराचा अडथळा येत नाही. त्यांनी एकदा फोनवर आपल्या वडिलांची माहिती सांगितली आणि मी त्यांच्यावर लेख लिहायला घेतला.

कै. रामचंद्र करकरे यांचा जन्म 21 जून 1908 रोजी देवभक्त गरीब कुटुंबात झाला. बालपणीच आईच्या प्रेमाला ते पारखे झाले. कितीतरी हाल अपेष्टा, हलाखीचे जीवन त्यांनी सुसह्य केले. कारण त्यांच्या मनातील आई होती ती फक्त “भारत माता” हीच माझी आई असे ते म्हणत. त्यांनी तन, मन सर्व अर्पून या मातेची सेवा केली.

अगदी लहान वयातच अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात उडी मारली. चंद्रशेखर आझाद यांच्या क्रांतिकारी गटात सामील झाले. त्यांच्यासह बॉम्ब तयार करण्यात ते अग्रेसर होते. काकोरी कांडच्या वेळी त्या बॉम्बचा उपयोग करण्यात आला होता. चंद्रशेखर आझाद यांच्याबरोबर एकदा त्यांची गुप्त भेटहि झाली होती.

गरिबीमुळे लहानपणी माधुकरी मागून पोट भरणे नशिबी आले. पण याच मुलाने पुढे असंख्य मुलांना शिकविले. आणि त्यांना सोन्या-चांदीची पदके बहाल केली.

कारण बालपणापासूनच असलेली त्यांची अभ्यासाची अतोनात आवड. सडकेवरच्या दिव्याखाली कसोशीने अभ्यास केला. त्या 17, 18 वर्षाच्या मुलाने देशप्रेमाचे कार्य करीत असतांनाही एक हुशार विद्यार्थी, कवी आणि लेखक म्हणून नावलौकिक मिळविला. साहजिकच हे लिहित असतांना आताची 17, 18 वयाची मुले डोळ्यासमोर येतात. शिकण्यासाठी त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा पालकांकडून पुरविल्या जातात. मुले भारंभार गुण मिळवतातही. पण या मुलांच्या जवळ सर्व गोष्टींचे जे गांभीर्य हवे ते आहे का? अभ्यासातून जे ज्ञान मिळायला हवे ते मिळते का? मागील पिढीतील 18 वर्षाच्या मुलाला जे देशप्रेम वाटत होते ते आत्ताच्या 18 वर्षाच्या मुलाला वाटते का? असे अनेक प्रश्न डोळ्यापुढे उभे राहतात.

कै. रामचंद्र करकरे यांनी एक प्रभावी बुद्धिमान वक्ता म्हणून नावलौकिक मिळवला. करकरे यांनी B.Sc. प्रथम श्रेणी आणि 1932 मध्ये एल.एल.बी. त प्रथम श्रेणी, प्रथम क्रमांक पटकावीत विश्वविद्यालयाचे जुने विक्रम मोडीत काढले. असे घवघवीत यश मिळविले त्यासाठी त्यांना सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 1938 मध्ये ग्वाल्हेर येथे सार्वजनिक सत्कार करणारे ते प्रथम सहकारी गणले गेले.

महात्मा गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर बालवयात जबरदस्त पगडा होता. त्यांच्या प्रेरणेमुळे असहकार चळवळीत रामचंद्र पुढे होते. परदेशी कापडांची होळी केली. जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचे कार्यपद्धती बघून कौतुक केल्याने ग्वाल्हेरच्या सभा यशस्वीपणे आयोजित करण्याचे काम त्यांच्यावर टाकण्यात आले. गांधीजींसह मंचावर बसून सभा भरविणारे तेच होते.

ते सुभाषचंद्र बोस यांचे अनन्य भक्त होते. त्यांनी आजाद हिंद फौजच्या समर्थनार्थ अनेक भाषणे दिलीत. त्यांच्या जीवनावर लिहिलेले 'जय हिंद' नावाचे नाटक बरेच गाजले. त्यांनी लिहिलेले लेख आणि पुस्तके यावर इंग्रज सरकारचा डोळा होता. त्यामुळे पोलिसांचा ससेमिरा त्यांच्या सौभाग्यवती इंदिरा बाईंना चुकवावा लागत असे.

1942 साली भारत छोडो चळवळीत हिरीरीने भाग घेतल्यामुळे त्यांची रवानगी इंग्रजांनी कारागृहात केली. क्रांतिवीर रामचंद्र करकरे 1938 मध्ये कलकत्ता व हरिपूर येथे स्वतः नेताजी सुभाषचंद्र बोस यांना भेटले होते. तेव्हा त्यांनी काँग्रेस अधिवेशनाच्या मंचावर स्वरचित कविताही वाचली होती. श्री. करकरे 1938 मध्ये काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारणीचे सदस्य होते. व त्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे समर्थन केले होते. व महात्मा गांधी व नेहरूचा विरोध केला होता. पुढे 1944 मध्ये नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी स्वतः करकरे यांचे आझाद हिंद फौज सेनेच्या मध्यभारत प्रांताचे संयोजक म्हणून नेमणूक केली होती. श्री. करकरे यांची इच्छा होती.

1. हिंदी राष्ट्रभाषा व्हावी.

2. वंदे मातरम् हे राष्ट्रगीत असावे.

3. भाषावर प्रांतरचना होऊ नये तर भौगोलिक प्रशासनाच्या आधारावर ती व्हावी. पंडित नेहरू व श्री. करकरे यांच्या याबाबतीत मतांमध्ये विरोध होता.

सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, भगवानदास माहौर, सदाशिव मलकापूर, गजानन पोतदार, डॉ. सदानंद, डॉ. मिलिंद, गोपीकृष्ण कटारे, भजनलाल शर्मा,

देवलाल रुद्र, डॉ. ह. र. दिवेकर या सर्व सेनानीसह करकरे यांचे संबंध होते. हे सर्वच थोर कार्यकर्ते होते आणि इंग्रज सरकारने यांना तुरुंगात भरपूर यातना दिल्या.

कै.करकरे याशिवाय एक श्रेष्ठ कवी व लेखक होते. जननी (काव्यसंग्रह) मधुमाधवी (कथासंग्रह) जय हिंद (नाटक) या त्यांच्या लोकप्रिय कलाकृती मानल्या गेल्या.

ते विचारवंत आणि कायदे तज्ज्ञ होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संधी असूनही सत्तेत वाटेकरी न होता सन 1950 ते 1968 पर्यंत एम्.एल.बी. कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

असे विद्वान आणि स्वातंत्र्याचा पाईक असलेले कै. करकरे यांचा ग्वाल्हेर निगमने ते जेथे राहात असत. त्या छत्री बाजारचे नामकरण स्व. रामचंद्र करकरे मार्ग असे करून त्यांचा योग्य सत्कार केला आहे.

स्वतंत्र भारतात त्यांनी मुख्यमंत्रीपद नाकारले. त्यांचे मत होते जे केले ते देशासाठी त्याचा उपभोग घ्यायचा नाही. त्यामुळे ताम्रपत्र, पेन्शन किंवा इतर सोयी देखील त्यांनी घेतल्या नाहीत. स्वतंत्र भारततही त्यांनी समाजसेवेचे व्रत घेतले होते. अनेक संस्था मंडळे त्यांनी स्थापित केल्या. अनेक संस्थांना त्यांनी देणग्या दिल्या. अनेक मंडळाचे अध्यक्ष तर काहींचे कार्यकर्ते राहिले.

नटसम्राट बालगंधर्व, कृष्णराव पंडित, विनायकराव पटवर्धन, राजश्री पुरुषोत्तम टंडन, नारायणराव व्यास, श्री. मैथिलीशरण गुप्त, जस्टीस शिवदयाल, श्रीवास्तव या सर्वांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यांचे विद्यार्थी त्यांना अतिशय प्रिय असत.

अनेक शिष्य ख्यातनाम झाले आहेत. त्यात स्व. श्री. शिवमंगल सिंग, श्री. अटल बिहारी वाजपेयी, श्री. जगदीश तोमर, स्व.राचींद्र द्विवेदी, श्री.बैजनाथ शर्मा, डॉ. ओमप्रकाश आर्य, महापौर/ खासदार ना.क. शेजवळकर, श्री. आर.डी. जैन आणि प्राचार्य जे.पी. शर्मा आणखी इतरहि आहेत.

भारताच्या या स्वातंत्र्यवीराने 24 फेब्रुवारी 1969 रोजी महाप्रयाण केले. ग्वाल्हेर व देशातील युवा पिढीसाठी त्यांच्या आठवणी सदैव प्रेरणा देतील.

या निमित्ताने मला आणखी एक आठवण सांगावीशी वाटते. कै.करकरे हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे निस्सीम भक्त होतेच. पण त्यांची मुले ही तशीच होती. त्यांनी मुलांना अनेक चांगले संस्कार दिले होते.

त्यांची मुलगी माझी मैत्रीण स्वाती वर्तक (माहेरची करकरे) खारला रहात असे. वर्तकांचा बंगला व स्वातंत्र्यवीर सावरकरांचा बंगला खारला शेजारी होते. सावरकरांनी आपला बंगला वर्तकांना विकला व खार सोडले. काही वर्षानंतर वर्तकांनी सावरकरांकडून घेतलेला बंगला एका सिंधी गृहस्थास विकला.

दिवस बदलले आणि बंगल्याची जागा मोठमोठ्या इमारतींनी घेतली. आजोबा वर्तकांच्या मुलाने ही तो बंगला विकून तेथे नव्याने बांधलेल्या टोलेजंग इमारतीमधील एका फ्लॅटमध्ये आपले बस्तान मांडले. सिंध्याचा बंगला अजून तसाच होता. काही वर्षानंतर तो विकला आणि बंगल्याची पाडापाडी सुरू झाली. सावरकरांसारख्या एका थोर वीराच्या वास्तव्याने पुनीत झालेले घर छिन्नविछीन्न झाले. तेवढ्यात त्या सिंधी गृहस्थांचे भाऊ वर्तकांच्या घरी आले. व सांगू लागले भिंत पाडताना भिंतीत एक मशीन मिळाले आहे. वर्तक तुमचे आहे का ते?

स्वातीताई व त्यांचे यजमान ते मशीन बघून आले. आल्यावर या दोघांचे मत पडले की ते सावरकरांचेच आहे. सावरकर या मशीनवर ब्रिटिशांच्या विरोधात पत्रके काढत असतील ते संग्राह्य होते. वर्तकांनी सुधीर फडक्यांच्या मदतीने सावरकरांच्या नातेवाईकांपर्यंत ही बातमी पोहचवली. सावरकर कुटुंबिय तेथे आले. त्यांनी सिंधी माणसाकडे ते मशीन मागितले. पण सिंधी गृहस्थाने ते दिले नाही. पोलीस केस झाली शेवटी पोलिसांनी ते मशीन हस्तगत केले आणि आज- काल ते खार पोलीस स्टेशनमध्ये धूळ खात पडले आहे. असे ऐकिवात आहे. स्वाती वर्तक हळहळल्या!

# माझे गुरु श्री. पाटील महाराज

काही घटना इतक्या अचानक घडतात की त्याची कल्पना किंवा त्याबद्दलचे विचार मनात यत्किंचितही आलेले नसतात.

माझे गुरु पाटील महाराज माझे सासरे कै. बापूसाहेब पटवर्धन यांचेकडे अधून-मधून येत असत. माझ्या विवाहानंतरही ते यायचेच. आम्ही माडीवर रहात होतो. पण ते जिना चढून कधीच वरती आले नाहीत. खाली सोपा होता. तेथे एक बाक होता. त्यावरच बसायचे. महाराज खाली आल्याची वर्दी यायची. मग मीच त्यांच्यासाठी केळी दूध घेऊन खालीच जायची.पण म्हणायचे सुनबाई जेवायला मागितले तर देशील ना? पण जेवायला यायचे नाहीत.

उगार- म्हैशाळ येथे त्यांची भक्तमंडळी होती. त्यामुळे उगारला जातांना येतांना ते कागवाडला यायचे. श्री समर्थ रामदासस्वामी म्हणतात की गुरु अनेक असतात. आई-वडील हेही गुरुच! विद्या शिकविणारे ज्यामुळे आपण अर्थार्जन करू शकतो तेहि गुरुच पण आध्यात्मिक गुरु हे वेगळे.

आम्ही कुटुंबीय 1972 ते 1980 पर्यंत म्हणजे आठ वर्षे नौबाग येथे राहिलो. सगळीकडेच 1972 साली मोठा दुष्काळ पडला. अतिशय कमी पावसामुळे विहिरी-नद्या- कालवे यांना पाणी नव्हते. पाण्याअभावी लोकांनी स्थलांतर केले. आमच्या

वाड्यातील विहिरीचेहि पाणी आटून गेले. त्यामुळे शेतावर रहायला जाणे भागच पडले. नौबाग येथे आमचा मळा. मळयातील घरीच आम्ही रहायला लागलो.

श्री. पाटील महाराज धुळगावकरांना आम्ही नौबागला रहायला गेल्याचे समजले असावे. तेथेही आमच्याकडे दोन- तीनदा आले. देवळातच बसायचे. एकदा देवळात बसल्यावेळी ते आल्याचे कळल्यावर कै.बापूसाहेब व मी त्यांना भेटायला गेलो. हे देऊळ म्हणजे श्री.ब्रह्मानंद महाराजांचा मठ. महाराजांची येथे समाधी आहे. कै.अप्पासाहेब पटवर्धन हे माझे आजे सासरे. श्री. गोंदवलेकर महाराजांचे निस्सिमभक्त. श्री. अप्पासाहेब पटवर्धनांनी गोंदवलेकर महाराजांचाच अनुग्रह घेतला होता. श्री. गोंदवलेकर महाराजांच्या सांगण्यावरूनच श्री. ब्रह्मानंद महाराज अप्पासाहेबांच्या मळयात तीन दिवस राहिले. व तीन दिवसानंतर त्यांनी तेथेच देह ठेवला. त्यांच्या सांगण्यावरूनच त्यांचा देह कृष्णेच्या डोहात सोडण्यात आला. नदीतील माशांसाठी त्यांनी देहदानच केलं!

आमचा मळा गावापासून तीन किलोमीटर लांब पूर्वी तिकडे वस्ती पण अगदी कमी होती. मळा कसायला गडी माणसे मिळायची पण नाहीत! पण श्री. ब्रह्मानंद महाराजांच्या मुक्कामामुळे मळयाकडे लोक यायला- जायला लागले. मळा पिकांने फुलू लागला! श्री. महाराजांच्या मुक्कामामुळे भुते पळून गेली. लोकांची भीती नाहीशी झाली!

कै.आप्पासाहेबांनीच नंतर आपल्या मळयातील जागेवर श्री. ब्रह्मानंद महाराजांची समाधी बांधली. आज ही पवित्र वास्तू खूप मोठी झाली आहे.

एकदा श्री. पाटील महाराज देवळात आले. मी दर्शनाला गेले. त्यांनी मला जवळ बसवून घेतले. पाठीवरून हात फिरविला. माझी चौकशी केली. पण काय कोणास ठाऊक वाड्यात आल्यावरही ते असाच हात फिरवायचे. माझे वय केवळ 32 वर्षांचे. तरुणपण! मला असा हात फिरवलेला आवडायचा नाही! नंतर थोड्यावेळाने ते म्हणाले सुनबाई तुला मी आज अनुग्रह देणार आहे! खरं सांगते मला अनुग्रह घेणे ही कल्पना माझ्या डोक्यात अद्यापपर्यंत कधीच आली नव्हती. कारण मी तरी त्यावेळी पूर्णपणे प्रपंचातच गुरफटलेली होते! प्रपंचात दंग होते. मी तशी देवभक्तच आहे. वडील गीता प्रचारक त्यामुळे कर्मयोगाचे संस्कार झालेले! व आई कायम मनोभावे घरातल्या देवांची पूजा करायची. त्यामुळे आम्हा भावंडावर दोन्हीही संस्कार झालेले. वडिलांनी श्री. गुरुदेव रानडे (निंबाळ) यांचा अनुग्रह घेतला होता हे ऐकलेले! फारसे त्यातले काहीच माहित नव्हते.

इकडे सासरी आल्यावर सासूबाई खूपच देवभक्त होत्या. सासरे पण आस्तिक होते. पण त्यांना पूजाअर्चा हे फारसे आवडायचे नाही. त्यांची देवभक्ती वेगळीच होती. सतत लोकांना कुठल्या ना कुठल्या प्रकारे उपयोगी पडणे हाच त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता. हीच त्यांची देव भक्ती.

श्री.पाटील महाराज मला अनुग्रह देण्याबद्दल बोलले. मठाच्या आवारात माझ्या सासऱ्यांनी दोन खोल्या बांधल्या होत्या. एका खोलीत मी व महाराज बसलो. त्यांनी माझ्या कानात गुरुमंत्र सांगितला व म्हणाले रोज एक तरी माळ जप कर. सुखी हो हा आशीर्वाद दिला व प्रेमाने पाठीवर हात फिरवला. पण त्या दिवशी मात्र मला त्यांच्या स्पर्शातून केवळ आणि केवळ मायाच कळली. आणि मनात आले अरे ह्या आधी आपणास असे का वाटले? पण त्याला माझ्याकडून उत्तर नव्हते!

कागवाडला पटवर्धनांचा वाडा होता. आम्ही रहात असलेल्या वाड्याच्या दिवाणखान्यात पाटील महाराजांचा छोटा फोटो लावलेला होता. या अनुग्रहानंतर मी तो आमच्या घरातील देवघरात लावला. रोजच्या पूजेतच तो ठेवला. मी लग्नानंतर सगळे सण- वार अगदी आवर्जून करायची. श्री.ब्रम्हानंद महाराजांच्या मठात भाद्रपदात आठ दिवस उत्सव असतो. तेथे आठ दिवस न चुकता जात होतो. जमेल ती सेवा करत होते. संसारात अडचणी- संकटे आली नाहीत असे नाही. पण महाराजांनी त्यातून आम्हाला सावरून नेले. मी देवभक्त तर आहेच. महाराजांच्या अनुग्रहामुळे जपहि करतेच. पण वडिलांच्या संस्कारामुळे. अनेक समाज उपयोगी कामेही केली. श्री.पाटील महाराजांच्यामुळे परमार्थाची गोडी लागली. म्हणून ज्ञानेश्वरी,गीता,दासबोध या ग्रंथावरील परीक्षांना बसले. यश मिळविले. प्रपंच व परमार्थ दोन्हीहिमुळे मी वयाच्या 80 व्या वर्षीहि सुखी समाधानी राहू शकले!

# माझा भाऊ शाम

माझ्या पाठचा भाऊ शाम हा एक सामान्यातलं एक असामान्य व्यक्तिमत्व असलेला आहे.

लहान असतांना तो खूप भित्रा होता. तो दहा वर्षाचा असतांना आम्ही दोघे उन्हाळयाच्या सुट्टीत बहिणींचेकडे वालचंदनगरला गेलो होतो. वालचंदनगरला माझ्या या दोनही बहिणी नोकरी करत होत्या. त्यांच्याकडे गेलो असतांना एके दिवशी संध्याकाळी आम्ही चौघे फिरायला म्हणून बाहेर पडलो. अर्ध्या रस्त्यात असतांना एकदम जोरदार वादळी वारे सुरु झाले. आकाशात काळया ढगांनी गर्दी केली. वारे इतक्या जोरात होते की चालणे सुद्धा मुश्किल होते. त्या वाऱ्याचा अवतार पाहून शाम जोरात रडायलाच लागला. मी आता पुढे येणार नाही म्हणून उलट्या दिशेने घराकडे पळू लागला. आमचं कुणाचंच काही चालेना. असा हा भित्रा शाम तरुण वयात इतका धीट झाला की अचंबाच वाटावा!

आम्ही सगळे त्यावेळी सांगली येथील गावभागात केळकर वाड्यात रहात होतो. वाड्यात जोशी आडनाव असलेले एक बिऱ्हाड होते. त्यांच्या घरी कुणीतरी आजारी होते. कोल्हापूरच्या नातेवाईकांना बोलावून आणायचे होते. शाम रात्री 11 वाजता शेजाऱ्यांची स्कूटर घेऊन कोल्हापूरला गेला व त्या नातेवाईकांना स्कूटरवरून

घेऊन आला. लहानपणीचा शाम इतका बदलला! धीट तर झालाच पण दुसऱ्याला त्याच्या अडचणीत मदत करू लागला. त्याच्यावर झालेले हे गीतेचेच संस्कार. आमचे वडिल गीता प्रवचनकार होते. बोटाला धरून गीतेचे संस्कार करावे लागत नाहीत. वडिलांच्या गीता प्रवचनांमुळे आम्हा मुलांवर ते बालपणापासूनच झाले.

दोन वर्षे कॉलेजचे शिक्षण पूर्ण करून त्याने ड्रापसमनचा कोर्स केला व त्याला सांगली इरिगेशनमध्ये नोकरी मिळाली. काही वर्षे त्याने नोकरी केली. पण त्याचा पिंड एके ठिकाणी राहून नोकरी करण्याचा नव्हता. त्याने नोकरी सोडून व्यवसाय केले. त्याने तीन व्यवसाय केले. प्रथम कोंबडी पाळणे हा व्यवसाय केला. व त्याचा हा पोल्ट्री फॉर्म खूप मोठा होता. बरा चाललेला व्यवसाय अचानक कोंबड्यांना आलेल्या आजारामुळे नुकसानीत आला. पुढे त्याने ट्रक घेतला. ट्रक वाहतुकीच्या वेळी तर काही वेळा तो ड्रायव्हरवर अवलंबून रहायचा नाही. स्वतःच ड्रायव्हर व्हायचा. त्याच्या या धाडसाची आम्हाला तर भितीच वाटायची. पण तो कधीच डगमगला नाही.

पटवर्धनांची शेती कागवाड (नौबाग) येथे आहे. शेत कसण्यासाठी आम्ही वाटेकरी लावले होते. शामने आमच्या एकंदर शेतीपैकी चार एकर शेती वाटणीने कसायला घेतली. त्याने केलेले उद्योगधंदे प्रत्येक वेगळ्या प्रकारचे. पण तो प्रत्येक व्यवसाय जीव ओतून करायचा. कष्टाला अजिबात मागे – पुढे पहायचा नाही. पण एकंदरीतच माणसाच्या आयुष्याचे वर्तुळ पूर्ण होण्यास नशीबाची उत्तम साथ लागते हे निश्चितच. ती मात्र माझ्या भावाच्या बाबतीत थोडी कमी पडली.

त्याचे आई- वडिलांवर नितांत प्रेम. विशेषतः आईवर तर अधिकच! आईच्या शेवटच्या आजारपणात त्याने तिची सेवा खूप केली. तिला बेड- सोर्स झाले. तर तो जखमा स्वच्छ करून मलम लावायचा. आईच्या सेवेत त्याने कधीच कसूर केली नाही.

बहिणींबद्दलही त्याला असेच प्रेम आहे. भाऊबीजेच्या ओवाळणीला तो काही वेळा रात्री १० वाजता सुद्धा आला आहे. सगळी नाती त्याने आपुलकीने जिव्हाळयाने सांभाळली आहेत.

समाजाबद्दलही त्याला प्रेम आहे. सांगली ब्राम्हण सभेचा अध्यक्ष, बी.जे.पी.चा कार्यकर्ता. मित्रांचेवर काही संकटे आली तर धावून जातो.

वयाच्या 72 व्या वर्षीपासून त्याने बासरी वादन व तबला वादन हे आवडीचे छंद जोपासायला सुरु केलेत. यासाठी तो शिकण्यासाठी क्लासला जाऊ लागला. फुलझाडांचीही त्याला अतिशय आवड आहे. काश्मीरला गेल्यावेळी तेथून त्याने गुलाबाची कलमे आणलीत. त्याच्या घराभोवतीची बाग अगदी देखणी आहे.

पत्नीसोबत त्याने भारत भ्रमण केले आहे. आई – वडिल आर्थिक परिस्थितीने गरीबच! पण त्यांनी मुलांचेवर उत्तम संस्कार केले. त्यांच्या पुण्याईमुळेच सर्वच भावंडाना आपापल्या संसारात चांगल्या सांपत्तिक स्थितीत जगता आले. आम्ही सर्वच भावंडे समाजाबद्दल प्रेम असणारी आहोत. आई- वडिलांनी केलेल्या कर्मयोगाच्या संस्कारामुळे आमची आयुष्ये समृद्ध झाली!

# माहेरवाशीण

श्रीमती प्रभाताई शिर्के यांनी बदलापूर येथे सुरु केलेल्या माहेरवाशीण या संस्थेबद्दल मी ऐकून होते. पण प्रभाताईंशी जेव्हा फोन झाला तेव्हा या संस्थेविषयीची सविस्तर माहिती कळली. स्वतः जवळ धैर्य, धाडस काही तरी करण्याची धडपड, आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य असेल तर प्रत्येक व्यक्ती आयुष्यात काही ना काही चांगले निश्चितच करू शकते.

श्रीमती प्रभाताईंच्यावर तर कितीतरी संकटे कोसळली. लग्नानंतर काही महिन्यातच मिस्टरांना हार्ट अटॅक आला. त्यावेळी प्रभाताईंची खूप धावपळ झाली. पतीची उत्तम सेवा केल्यामुळे ते या दुखण्यातून बरे झाले. ते आधी आकाशवाणीवर बासरी वादक व संगीत दिग्दर्शक म्हणून काम करीत होते. पण या आजारामुळे त्यांना नोकरी करणे अवघड झाले.

संसाराची गाडी चालवायला पैसा तर आवश्यकच असतो. प्रभाताईंनी मनाशी विचार केला की कोणता उद्योग केला तर आपली आर्थिक अडचण निवारली जाईल. त्यांनी आपल्या ओळखीच्या लोकांसाठी पोळी – भाजीचे डबे सुरु केले. यात त्यांना थोडे – फार पैसे मिळू लागले. त्या उतम पुरणपोळी बनवायच्या त्यामुळे त्यांनी ठरविले की आपण पुरणपोळ्या बनवून विकायच्या. उत्तम पुरणपोळ्या बनविणे हा कौशल्याचाच भाग आहे. मुख्य म्हणजे त्यांनी कुठलेच काम करण्यात

कमीपणा कधीच मानला नाही. त्यांची ओळख डबे करणारी, पुरणपोळया विकणारी बाई अशी झाली तरी त्यांना त्यात मुळीच कमीपणा वाटला नाही. कुठलेही काम असो ते सच्चेपणाने, मनापासून करणे महत्वाचे.

पती, हृदय विकाराच्या झटक्यामुळे अंथरुणावर झोपूनच होते. शिवाय त्यांना थोडेफार अपंगत्वही आले होते. पण प्रभाताई हात – पाय गाळून बसल्या नाहीत. एकेकदा त्यांना 500 पुरणपोळयाची ऑर्डर आली. ती ही त्यांनी उत्तम पुरणपोळया करून देऊन ऑर्डर पूर्ण केली. पण अशा कामात त्यांना काही महिलांचे सहाय्य निश्चितच झाले.

त्यांनी लवकरच तळवळकरांचे जीम जॉईन केले. तेथे त्या इंस्ट्रक्टर म्हणून काम करू लागल्या. प्रथम त्यांनी या जीममध्ये प्रशिक्षण घेतले.

पोळी – भाजी डबे करणे, पतीची देखभाल करणे हे सुरूच होते. तळवळकरांच्या जीममधील अनुभवानंतर त्यांनी स्वतःचेच जीम सुरु केले. थोड्याश्याच साधनानिशी त्यांनी हे जीम सुरु केले. पण बऱ्याच बायका जीमला येऊ लागल्या. त्यामुळे त्यांनी मोठी जागा घेतली.

त्यांची मुलुंडची जागा छोटी होती. आपला एक बंगला असावा असं त्यांचं स्वप्न होतं. ते साकार करण्यासाठी वाटेल तितके कष्ट करण्याची त्यांची तयारी होती. अशात बदलापूरला त्यांना जागा मिळत होती पण यासाठी त्यांना कर्ज काढावे लागणार होते. त्यांचे वय 58 वर्षे असून सुद्धा सारस्वत बँकेने त्यांना कर्ज दिले. तसेच प्रतिभाताई पिळगावकर यांनीही त्यांना मोठ्या रकमेची मदत देऊ केली. यजमानांची सेवा करत असल्यामुळे बदलापूरच्या जागेत वृद्धाश्रम सुरु करावा असे त्यांना वाटत

होते. त्या जागेत जिम चांगले चालले होते पण 2005 ला पूर आला. आणि पुराचं पाणी घरात शिरलं. सगळे कष्ट पाण्यात गेले. पण प्रभाताई कणखर स्वभावाच्या होत्या. पुन्हा शुन्यातून सगळे उभे करायची वेळ आली. दुर्दैव असे की त्यांच्या यजमानांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. पण डॉक्टरांनी त्यांना उपयोग नसल्यामुळे घरीच नेण्यास सांगितले. अखेर जे विधी लिखीत होते तेच घडले. यजमान स्वर्गवासी झाले. या आघातामुळे त्या सैरभैर झाल्या. पण पुन्हा सावरल्या. त्यांच्या जीवलग मैत्रीणींनी त्यांना सांगितले की या तुझ्या जागेत महिलांसाठी माहेर सुरु कर. ही अभिनव कल्पना होती. प्रभाताईंना ती खूप आवडली. पहिल्यांदा 15 जणींचा ग्रूप आला. त्यांना औक्षण करून आत घेतलं. गरम पाण्याने पाय धुतले. त्यांना पुलाव कढी करून खायला दिली. असं प्रेम मिळाल्यामुळे महिला भारावून गेल्या. त्यांनी आपल्या इतरही मैत्रिणींना ही माहिती सांगितली. प्रभाताई म्हणतात मला हे माहेर उभे करण्यासाठी बऱ्याच महिलांनी प्रोत्साहनही दिले व भरपूर मदतही केली. या संस्थेमध्ये बऱ्याच गरजू महिलांना कामही दिले. गरजू महिलांना रोजगार मिळवून दिल्यामुळे त्यांना असलेले सामाजिक भान लोकांना प्रकर्षाने दिसून आले. 2019 साली आलेल्या पुरामध्ये त्यांनी आपल्या बंगल्यात 50 लोकांना आश्रय दिला. स्वतःवर आलेली अनेक संकटे झेलून त्या दुसऱ्याच्या मदतीसाठी धावून गेल्या.

अनेक महिला माहेरवाशीणमध्ये येऊन तेथील स्वागताचा आनंद घेऊ लागल्या. इकडे पुरणपोळ्या, मोदक आम्रखंड अशाही पदार्थांची आलेली ऑर्डर प्रभाताई पुरी करीत होत्या.

प्रभाताई शिर्के यांच्या जीवन प्रवासातून हाच संदेश मिळतो की संकटे आली तरी घाबरून जाऊ नका. त्याच्याशी दोन हात करा. जिद्द, चिकाटी व कष्ट या बळावर निश्चीत उज्वल भविष्य घडविता येते. अशावेळी श्री. वामनराव पै यांनी म्हटलेले तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार याची सत्यता पटते. (प्रभाताई शिर्के यांचा मोबाईल नंबर 9923564125 बदलापूर)

श्री समर्थ रामदासस्वामी ही हेच सांगतात की अथक प्रयत्नाने मनुष्य आपली भाग्यरेषाही बदलू शकतो!

# एक सच्चा सामाजिक भान असणारा माणूस

श्री. राघवजी नरसाळे यांच्यावरती वॉट्सऍपवर एक पोस्ट आली होती. त्याच्या खाली त्यांचा फोन नंबरही दिला होता. त्यांनी केलेलं काम वाचून मला त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल अतिशय कौतुक व ते जाणून घेण्याची उत्सुकताही वाटली. मी त्यांना फोन केला. फोनवर ते अतिशय नम्रपणे बोलत होते. बोलून झाल्यावर त्यांनी व्हॉटस्ऍपवर माझ्यासाठी एक मेसेजही पाठवला. तुमच्याशी बोलून खूप बरे वाटले. तुमचा आशीर्वाद असूदे. त्यांची ठाण्याच्या अत्रे कट्ट्यावर झालेली मुलाखत मला पाठवून दिली. ती मुलाखत ऐकूनच मी लेख तयार केला.

श्री. राघवजी हे ठाण्याचेच. आई- वडिल दोघेही शिक्षक. वडिल तर गणितात अतिशय हुशार. त्यांनी मॅट्रीकमध्ये 100 पैकी 100 गुण मिळवले होते. राघवजी लहान होते तेव्हा पासूनच आई- वडिल त्यांना चांगली भाषणे ऐकायला घेऊन जायचे. मुंबईमध्ये भरणारी प्रदर्शने दाखवायला न्यायचे. उत्तम पुस्तके वाचायला द्यायचे. बालपणी त्यांच्यावर असे सर्व प्रकारचे उत्तम संस्कार झाले. घरी काही गरीब मुले जेवायला यायची. काही राहायलाही यायची.

आपण समाज असतो. समाज घरातच असतो. ज्या समाजात आपण राहतो त्यामध्ये काही सकारात्मक बदल करता आला तर चांगलेच. कारण तो समाज आपला असतो. तो आपल्यालाही मोठं करतो.

राघवजी म्हणतात आई- वडिलांनी मुलांवर मार्कांचे कधीच दडपण आणले नाही. पहिला नंबर मिळव अशी कधीच अपेक्षा केली नाही. तर एक चांगला नागरिक हो असे म्हणायचे. राघवजी सुद्धा आपल्या संपर्कात येणाऱ्यांना हेच सांगतात की तुम्ही उत्तम नागरिक झालात तरी खूप चांगले.

शाळेत शिकत असतांना राघवजींचे इंग्रजी खूप कच्चे होते. फक्त 34 मार्क्स मिळायचे. पण श्री. मुरडेश्वर गुरुजींनी त्यांचे इंग्रजी उत्तम करून घेतले. इंग्रजी कच्चे असणारा मुलगा पुढे कुठे व्याख्यानाला बोलावले की इंग्रजीत उत्तम प्रकारे आपले विचार सांगू शकू लागला. हे श्री. मुरडेश्वर गुरुजींमुळे घडले. म्हणून राघवजी म्हणतात गुरू फार महत्त्वाचा आहे.

राघवजी नववीमध्ये होते त्यावेळी B.Sc. ला 99.7 मार्क्स मिळालेल्या एका विद्यार्थ्याला त्यांच्या वडिलांनी त्या मुलाचा शोध घेऊन त्याची M.Sc. ची रु. 10 हजार फी भरली. त्यावेळी दहा हजाराची किंमत खूप मोठी होती. आज तो मुलगा एका कंपनीत उच्च पदावर काम करतो आहे. दुसऱ्याला मदत करण्याचे संस्कार राघवजींच्यावर विद्यार्थीदशेत असतांना झाले. पूज्य साने गुरुजी, गो. नी. दांडेकर यांची पुस्तके त्यांनी वाचली. वाचनाने प्रगल्भता येते.

अकरावीत असतांना त्यांनी उत्स्फूर्द भाषण स्पर्धेत भाग घेतला होता. 30 सेकंद दिलेल्या विषयावर विचार करायचा व मग आपले विचार भाषणातून मांडायचे. हा त्यांच्या जीवनातील पहिला टर्निंग पॉइंट होता. चांगल्या पुस्तक वाचनामुळे त्यांचा वैचारिक पाया उत्तम घातला गेला. भाषणामुळे त्यांना कळून आले की आपल्याला त्या विषयातले किती कळले आणि किती कळले नाही हे समजले. त्यामुळे वाचन,

विचार व विचारातून मांडणी ही एक लॉजिकल प्रक्रिया त्यांना दिसली. मी माझे विचार बोलू शकतो हे त्यांना समजले. मग त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. अनेक स्पर्धेत भाग घेतला. पारितोषिकेही मिळवली. इंग्रजी कच्चे असणारा मुलगा आपले विचार इंग्रजी भाषेत उत्तम मांडू लागला. हा एक मोठा सकारात्मक बदल झाला.

बारावीत असतांना सुट्टीमध्ये मुलाने काहीतरी वेगळे करावे असे आईला वाटले. त्या मुंबई ग्राहक पंचायतीचे काम करायच्या. त्यांचे काम खूप मोठे व विविध स्तरावरचे होते. त्या चेअरमनही होत्या. मुंबई ग्राहक पंचायतीने युवा वर्गासाठी ग्राहक हिताय अशी एक बोरवलीला कार्यशाळा ठेवली होती. दोन दिवसांसाठीच होती. राघवजींनी ही कार्यशाळा केली. तिथे त्यांना अनेक चांगली माणसे भेटली. श्री. विवेक पत्की, ललिता कुलकर्णी, दिवंगत गोविलकर सर यांचे मार्गदर्शन लाभले. राघवजी मुंबई ग्राहक युवा कंझुमरचे अध्यक्ष झाले. त्यांनी अनेक कामे केली. रेल्वे स्टेशनवर जाऊन ग्राहक जागृति करणाऱ्या पुस्तकाची विक्री केली. रेल्वेने जाणारे लोक घाईगडबडीत असतात पण त्यांनाही या पुस्तकाचे महत्त्व सांगितले. शाळा कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी बोलले. वयाच्या 18 व्या वर्षी त्यांनी हे काम केलं. B.Sc. करीत असतांना मुलांना कसे हाताळायचे याचा वर्कशॉप केला. स्वतः कुठलेही व्यसन केले नाही. स्वतःचे चारित्र्य उत्तम असले तरच आपण दुसऱ्यांना कसे वागावे हे शिकवू शकतो. स्वतः जसे वागले तेच मुलांशी बोलले. राघव हे नाव त्यांनी सार्थ केलं.

मुंबई ग्राहक पंचायतीचा पाया लॉजिकल लोकांनी भरलेला आहे. उत्तम पाया असेल तरच इमारत भक्कम होते. श्री. विवेक पत्की, लीलाताई कुलकर्णी, श्री. अशोक रावत लॉजिकली बोलणं आणि दुसऱ्याला ते पटविणं हे महत्त्वाचे. राघवजी म्हणतात त्यांचे गुरु दोन प्रकारचे एक वैयक्तिक गुरु व दुसरे संस्थात्मक गुरु. श्री. प्रदीपजी हे पहिले वैयक्तिक गुरु. ग्राहक पंचायत हा पहिला संस्थात्मक गुरू. श्री. प्रदीपजी मेहता यांचे एक साऊथ एशियावरचे एक प्रोजेक्ट होते. मुंबई ग्राहक पंचायतीने माझे नाव सुचविले. माझा इंटरव्यू घेण्यासाठी श्री. प्रदीपजींनी कलकत्त्याहून एक माणूस पाठवला होता. त्यांना पहायचं होतं की हा 19 वर्षांचा मुलगा आहे तरी कोण? मी तसं पुष्कळ वाचन लिखाण केलं होतं. माझं सर्व लिखाण इंग्रजीत होतं. मी एक पाण्यावर प्रोजेक्ट केलं होतं. ते त्यांना दाखवलं. त्यांनी ते श्री. प्रदीपजींना सांगितलं आणि मला माझे हे दुसरे वैयक्तिक गुरु मिळाले. श्री. प्रदीपजींनी मग मला सतत बोलावलं. मी नंतर M.A. अर्थशास्त्र केलं. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय देशात मोठ्या पातळीवर मला त्यांनी एक्सपोजर दिले. मी 21 वर्षांचा असतांना श्री. नरेंद्र मोदी जेव्हा पंतप्रधान म्हणून आले त्यावेळी जी त्यांनी समिती स्थापली होती त्यात श्री. विवेक डेब्राय होते. मी त्यांच्या जवळच एका स्टेजवर बसून बोललो आहे. श्री. प्रदीपजींनी मला माझे विचार मांडायला सांगितले होते. या गुरुमुळेच मी घडलो. तेव्हा गुरु हा अनिवार्य आहे. तो शोधा तरच आपली प्रगती होऊ शकते. C.M.I.F. या संस्थेत त्यांनी काही महिने काम केलं व नंतर टाटामध्ये नोकरी केली. रतन टाटा यांचेकडूनही त्यांना शाबासकी मिळालेली आहे. त्याआधी सिंगापूरमध्ये जी जागतिक व्यापार संघटनेची पहिली परिषद भरली तिथे त्यांना श्री. प्रदीपजींनी पाठविले. त्यांनीच फायनान्स केलं. तिथे जे- जे घडले त्याचे त्यांनी लेखन केलं.

श्री. सुनील भांडारे इकॉनॉमिकल ऍडव्हाईजर यांनी सर्व लिहायला सांगितले. ते प्रसिद्ध करायचे ठरविले. मला श्री. रतन टाटांचेकडून शाबासकीची नोट आली.

पुढे आशियाई देशात आर्थिक मंदी येणार असे यांनी बोलून दाखविले. श्री. व्ही. जी. देशमुख सर म्हणाले राघव तुला हे नक्की वाटते ना? मी म्हटले हो हे होणार आहे. पुढे मी टाटांची नोकरी सोडली व श्री. प्रदीपला जॉईन झालो. त्याची Cuts ही संस्था आहे. मी व प्रदीपने आंतरराष्ट्रीय विकसित देशातील विचार व बोलणे सुरू केले. अनेक उत्तम लोकांबरोबर काम केले. हे एक वर्तुळ आहे. वयोमानाप्रमाणे या वैचारिक वर्तुळाचा परीघ वाढवावा लागतो. आपल्या कार्यातील प्रगतीप्रमाणे वर्तुळाचा परीघ वाढतो व ते महत्त्वाचे आहे. श्री. राघवजींनी अथक परिश्रम केले. उत्तम मित्र मिळाले. मित्रही मोठे झाले.

केंद्र सरकारने यांना एक मोठे काम दिले. श्री. प्रदीपजी हे स्पर्धेसाठी जे नियम असतात त्या वर्किंग कमिटीमध्ये होते. मोठ- मोठे लोक या कमिटीत होते. प्रदीपजींनी या कमिटीतील आपली जागा राघवना दिली. ते सर्वात लहान होते. पण त्यांचे विचार ऐकून सगळेच खूष झाले. विकसनशील देश व विकसीत देश हे कृषीवर सबसिडी देतात. जागतिक व्यापारामध्ये हा विषय महत्वाचा व चर्चेचा होता. सबसिडी देणं बंद केलं तर स्पर्धेमध्ये तुम्ही आमच्याबरोबर येऊ शकाल. असे विकसनशील देशाचे म्हणणे. वस्त्र मंत्रालयाने यांना एक प्रोजेक्ट दिले. कपाशीवरील सबसिडीचे. राघवजींनी यासाठी अनेक देश पालथे घातले. अनेकांशी बोलले व प्रबंध लिहिला.

श्री. सुधीर गोकर्ण यांचे मार्गदर्शन लाभले. या माझ्या प्रबंधावरून केंद्र सरकारने आपली जागतिक व्यापाराबद्दल चांगली भूमिका मांडली. त्यावेळी बराक ओबामा भारतात येणार होते. त्यांचे वाणिज्य सेक्रेटरी व आपले वाणिज्य सेक्रेटरी यांच्यामध्ये या डेटाबद्दल खूप चर्चा झाली. त्यांचा डेटा वापरून त्यांचं म्हणणं खोडून काढलं. राघवजी म्हणतात नुसते विचार उपयोगी नाहीत तर त्याला एक डेटा हवा. नंतर श्री. माशेलकर सर भेटले. ते त्यांचे गुरु झाले. श्री. माशेलकर सर अशी व्यक्ती की ज्यांच्या पायाजवळ बसावं.

ऍक्सेनशुअर कंपनीत ते भेटले. नुसता डेटा नाही त्यावर कृती हवी ती श्री. माशेलकर सरांनी शिकवली. ते राघवजींना म्हणायचे तू एखादं मॉडेल तयार केलंस तरी पुढे जाऊन ते कृतीत येते का हे महत्वाचे. ही वैचारिक झेप श्री. माशेलकर सरांमुळे त्यांना मिळाली.

अजूनही त्यांचे आशीर्वाद राघवजींना मिळतात. ऍक्सेनशुअर कंपनीत राहून राघवजी खूप शिकले. ते म्हणतात प्रत्येक ठिकाणी मला गुरु भेटले म्हणून मी पुढे जाऊ शकलो.

लहानपणापासून आई- वडिलांनी केलेले संस्कार की उत्तम नागरिक हो, समाजासाठी प्रत्येकाने काही- ना काही केले पाहिजे. ह्यातून त्यांनी लोकांसाठी 100 रुपयांत Ambulance सेवा उपलब्ध करून दिली. त्याचे असे झाले चार वर्षांपूर्वी त्यांच्या आईला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी Ambulance हवी होती. व त्यासाठी त्यांना भरमसाठ किंमत मोजावी लागली. आणि म्हणून त्यांनी तेव्हा ठरविलं की यासाठी काहीतरी करायला हवे. त्यांनी स्वतःच्या पैशांतून 17 लाख रुपये खर्चून

Ambulance खरेदी केली आणि ठरवलं की नवी मुंबईत रुग्णांना 100 रुपयांत ही सेवा उपलब्ध करून द्यायची. आता गेली 4 महिने श्री राघवजी नवी मुंबईतील रुग्णांना ही सेवा उपलब्ध करून देत आहेत. हे काम करतांना त्यांना अतिशय समाधान होत आहे. ते म्हणतात आपण कोणासाठी काही करत आहोत हे खूप सुखावणारं आहे. त्याहीपेक्षा तो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांना झालेला आनंद तर खूपच समाधान देणारा असतो. पण 17 लाख खर्च केले आणि झाले असे नाही तर ड्रायव्हर सकट Ambulance देखभालीचा महिन्याचा खर्च साधारणपणे 30 हजार रुपये ते करतात! हे ऐकून तर मला वाटले कर्मयोग म्हणजे निराळा काय असतो हो? एवढी दातृत्व असलेली व्यक्ती विरळाच!

लोकांच्या मदतीसाठी असे धावून जाणारे श्री. राघव केवळ 48 वर्षांचे असून ते एका बहुराष्ट्रीय कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. असे जबाबदारीचे पदावर काम करत असतांना माझ्या मनात एक प्रश्न आला की त्यांना असे सामाजिक काम करायला सवड कशी मिळत असेल? ते म्हणतात जो बिझी असतो ना त्यालाच वेळ असतो! उत्तरही वरवर विरोधाभासाचे वाटणारे! पण खरंच आहे ज्याच्यापाशी वेळ असतो तोच बिझी असतो!

सामाजिक भान असणारे, एक उत्तम नागरिक, एक उत्तम अर्थतज्ज्ञ अशा या उत्तुंग व्यक्तीला मनापासून वंदन!

श्री. राघवजी नरसाळे यांचा फोन नंबर – 9820770021.

# संगीत प्रेमी श्री. कालगांवकर सर

एखाद्याचा छंद इतरांनाही किती आनंद देतो हे कालगांवकरांच्या छंदावरून कळते. श्री. कालगांवकर सर अलीकडे बरीच वर्षे कोल्हापूरला रहात आहेत. माझे पती कै. सतीश पटवर्धन हे कोल्हापूरला इंग्रजी विषय घेऊन M.A. करीत होते. M.A. करण्यापूर्वीच हे कागवाड येथील हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी करत होते. घरच्या आर्थिक अडचणीमुळे ह्यांना B.A. झाल्यानंतर नोकरी करावी लागली. पण M.A. झाल्याशिवाय तरणोपाय नाही म्हणून यांनी नंतर कोल्हापूर शिवाजी विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन M.A. केलं. त्यावेळी कालगांवकर सर बस स्टॉपवर असायचे. हे ही विद्यापीठाकडे जाणाऱ्या बससाठी बसला थांबलेले असायचे. त्यावेळी बस स्टॉपवर थांबलेले हे तरुण एकमेकांशी बोलायचे. त्यातूनच ओळख वाढली व पुढे चांगले मित्र झाले. दोघांचे M.A. ला विषय वेगळे असूनही त्या दोघांमधील संगीत हा विषय समान होता व अत्यंत जिव्हाळ्याचाही! दोघेही स्वभावाने सालस, निगर्वी, संगीत प्रेमी शिवाय मिस्किलहि. अशा समान धाग्यामुळे मैत्री जमायला वेळ लागला नाही!

श्री. कालगांवकर सरांचा जन्म साताऱ्याचा! त्यांचे वडिल तेथे एका विमा कंपनीमध्ये नोकरी करत होते. सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सरांचे नववी पर्यंतचे शिक्षण झाले. पुण्याला डेक्कन एज्युकेशन सोसायटीने फर्ग्युसन कॉलेज काढले. पण तेथे नोकरी करणाऱ्या प्राध्यापकांना सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दोन वर्षे

नोकरी करणे सक्तीचे होते. त्यामुळे त्यावेळी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षक लाभले. कालगांवकर सर म्हणतात हे आमचे मोठे भाग्य!

श्री.कालगावकरसरांचा जन्म साताऱ्याचाच! अगदी लहानपणापासूनच त्यांना गाण्याचे वेड होते. त्यावेळी ग्रामोफोन होते. सरांची आई त्यांना सांगायची की अरे रात्री झोपतांना सैगलची शहेनशहा चित्रपटातील गाणे लावल्याशिवाय तू झोपायचाच नाहीस! बाळाचे पाय पाळण्यात दिसतात ही म्हण तंतोतंत खरी आहे हे दिसून येते.

श्री.कालगावकरसरांचे नववी पर्यंतचे शिक्षण साताऱ्यात झाले. पुढे वडिलांच्या बदलीमुळे ते कोल्हापूरला आले. उर्वरित M.A. पर्यंतचे सर्व शिक्षण त्यांचे कोल्हापूरला झाले. संगीताप्रमाणे गणित हा विषयहि त्यांचा अत्यंत आवडीचा. अकरावीनंतर ते गोखले कॉलेजमध्ये Pree Degree ला गेले. त्यावेळी त्यांनी सायन्स शाखा निवडली होती. पण इंटर सायन्स झाल्यावर त्यांना कळले की गणित घेऊन B.Sc. व्हायचे असेल तर गणित या विषयाचा पेपर 500 मार्काचा असतो. पण B.A. ला मात्र गणित 600 मार्कांचे असते. त्यामुळे गणिताचा जास्त अभ्यास होईल म्हणून त्यांनी सायन्स शाखा बदलून आर्टस् शाखा निवडली. व ते राजाराम कॉलेजमधून उत्तम गुणांनी B.A. झाले. पुढे त्यांनी गणित विषय घेऊन M.A. केले. त्यावेळी ते शिवाजी युनिव्हर्सिटीत पहिले आले. घवघवीत यश मिळाले. त्यामुळे त्यांना एकदम तीन नोकऱ्या चालून आल्या. पण सोयीच्या दृष्टीने त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचीच नोकरी स्वीकारली!

त्यावेळी श्रीमंत लोकांच्याकडे ग्रामोफोन असायचे. श्री. कालगावकरांना बालपणापासूनच संगीत आवडायचे. त्यामुळे त्यांनी पण वडिलांच्या बरोबर हट्ट धरला की आपल्यासाठी ग्रामोफोन घ्या. त्यावेळी गाण्याच्या काळया तबकड्या असायच्या. 1962 सालापासून सरांनी रेकॉर्डस् विकत घेऊन संग्रह करायला सुरुवात केली. एव्हाना रेडिओनं चांगलाच जम बसवला होता. व ग्रामोफोन रेकॉर्डस् घेण्याची, ऐकण्याची लोकांची आवड कमी झाली होती. दीर्घकाळ चालणाऱ्या प्लास्टिकच्या एल.पी./ई.पी. रेकॉर्ड्स व विजेवर चालणारे रेकॉर्ड प्लेअरही येऊन काही काळ लोटला होता. ग्रामोफोनच्या लाखेच्या रेकॉर्डस् कमी झाल्या होत्या. कोल्हापूरातील दुकानातून त्यावेळी या ग्रामोफोनच्या रेकॉर्डस् विकत मिळायच्या. पण त्या व्यतिरिक्त कुणाकडे पडून असलेल्या रेकॉर्डस् मिळतात का याचा शोधही सर घेत असत. रेकॉर्डस् जमा करण्याच्या या छंदात त्यांना तऱ्हेतऱ्हेची माणसं भेटली.

एक विलक्षण हकीगत अशी की बिंदू चौकाकडून शिवाजी पुतळ्याकडे जातांना वाटेत निम्म्या अंतरावर डाव्या बाजूला भारत वॉच कंपनी म्हणून एक दुकान नव्यानेच सुरू झालं होतं. या दुकानच्या जागी पार्टे ढवळे आणि कंपनी यांचं रेकॉर्डस् विक्रीचे दुकान होते. तेव्हा श्री. कालगावकरांनी या भारत वॉच कंपनीमध्ये विचारणा केली की इथं जे पूर्वी दुकान होतं त्यातील रेकॉर्डस् तुमच्याकडे आहेत का? तर त्यांनी नाही असं सांगितलं. मग सरांनी ढवळे यांचा शोध सुरू केला. ढवळे भेटले ते म्हणाले माझ्याकडे थोड्या रेकॉर्ड्स होत्या. पण मी भारत वॉच कंपनीला दुकान विकलं त्यावेळी ते सर्व सामान चौथ्या मजल्यावरच्या माळयावर ठेवले आहे. आता मला वेळ नाही तेव्हा पंधरा दिवसांनी या. सर पंधरा दिवसांनी पुन्हा गेले तेव्हा ढवळे म्हणाले आताही मला वेळ नाही. अजून पंधरा दिवसांनी या. पण सरांनी जिद्द सोडली

नाही शेवटी ढवळेच कंटाळले व किल्ल्या घेऊन उठले. दोघेही भारत वॉच कंपनीच्या दुकानाकडे गेले. वर जायला अरुंद असा जीना. अंधार माळयावर प्रचंड धुळ! ते ढवळे तर वैतागलेच. पण सरांनी धीर सोडला नाही. सर स्वतःच थोडी- थोडी धूळ झटकू लागले. वर एका ठिकाणी त्यांना रेकॉर्डस् दिसल्या. सरांना अत्यानंद झाला! पण ढवळे घाई करू लागले. म्हणाले चटकन घ्या. एका रेकॉर्डचे 2 रुपये द्या. दहा रेकॉर्डचे 20 रुपये. त्यावेळी म्हणजे 1965 साली 20 रुपयालाही खूप किंमत होती. रेकॉर्डस् घेऊन सर घरी आले. त्या पाण्यात बुडवून स्वच्छ केल्या. त्यावर असलेला कागद जाणार नाही याची काळजी घेतली. ज्या रेकॉर्डस् मिळविण्यासाठी सर दोन वर्षे प्रयत्न करीत होते. त्या त्यांना मिळाल्या. कुमार गंधर्वांनी वयाच्या आठव्या व दहाव्या वर्षी गायलेली रामकली व बागेश्री रागाची रेकॉर्ड त्यात होती. कुमार गंधर्वांचा बालपणीचा आवाज अतिशय निरागस व गोड होता. त्यांनी गायलेली चीज म्हणजे परमेश्वराच्या भेटीची लागलेली आस अशा अर्थाची आहे. ह्या लहान वयात सुद्धा त्यांच्या आवाजात आर्तता होती.

या दोन्ही रेकॉर्डस् आम्ही उभयतांनी त्यांच्या घरीच ऐकल्या. सरांच्या घरी गाणे ऐकायला जाणे ही माझ्या पतींसाठी पर्वणीच असायची!

श्री. कालगावकर व कुटुंबीय मंडळी काही वर्षे राजाराम कॉलेजच्या स्टाफ क्वार्टसमध्ये राहिली होती. नंतर त्यांनी 2001 साली ही मंडळी आर. के. नगरमध्ये त्यांनी बांधलेल्या स्वतःच्या घरी रहायला गेली.

सरांची मुलगी गौरी ही पण संगीत खूप आवडणारी! ती सुगम संगीताच्या परीक्षेत विद्यापीठात प्रथम आली होती. शिवाजी विद्यापीठामध्ये संगीताच्या

पदविका वर्गामध्ये ती शिकत होती. कला क्षेत्रामधील प्रसिद्ध व्यक्तींना या विभागात आमंत्रित केले जायचे. त्यावर्षी श्री. बापू वाटवे यांना बोलाविले होते. श्री. बापूंनी विद्यापीठात तीन दिवस विविध कार्यक्रमात भाग घेतला. शेवटच्या सत्रात गौरीने बापूंची गाठ घेऊन आपल्या वडिलांचा हा संग्रह बघण्यासाठी घरी येण्याचे आमंत्रण दिले. श्री. बापू वाटवे त्यांच्या घरी आले. त्यावेळी श्री. वाटवे यांनी सरांना अनेक आठवणी सांगितल्या. घरातील वातावरण संगीतमय झाले. श्री. कालगावकरांनी त्यांच्या संग्रहातील प्रभातच्या चित्रपटातील गाणी श्री. बापूंना ऐकवली. ही सगळी गाणी ऐकून बापूंनाही अतिशय आनंद झाला. श्री. केशवराव भोळे यांनी गायलेल्या काही गाण्याच्या रेकॉर्डसही सरांनी बापूंना ऐकवल्या. ती गाणी बापूंनी कधीच ऐकली नव्हती. त्यामुळे ते आश्चर्यचकित झाले. पुण्याला गेल्यावर त्यांनी मुद्दाम ज्योत्स्नाताई भोळे यांची घरी जाऊन भेट घेतली. व श्री. केशवरावांची गाणी मला कोल्हापूरच्या कालगावकरांचेकडे ऐकायला मिळाल्याचे सांगितले. ज्योत्स्नाताई त्यावेळी आजारी होत्या. पण आपल्या पतीचा आवाज कोल्हापूरला ऐकायला मिळतो हे ऐकून आनंद झाला! ग्रामोफोन रेकॉर्डचा संग्रह करण्याचा छंद जडल्यावर साहजिकच जास्त रेकॉर्डस् नौशादांच्या गाण्याच्याच घेतल्या गेल्या. प्रत्येक रेकॉर्ड सर काळजीपूर्वक ऐकत. त्यामुळे त्यांना गाण्यातले बारकावेही कळायला लागले. 'मेरे दिल में सेंकडो अरमान' हे नमस्ते चित्रपटातले गाणे रेकॉर्डवर ऐकले आणि तसेच शहनाई चित्रपटातलं 'आजा मेरी जान' हे ऐकलं. या दोन्ही गाण्यामधील दोन कडव्यामधील Interlude Music मधील साम्य. वास्तविक पहिला चित्रपट 1943 मध्ये आला व दुसरा शहनाई 1947 साली आला. पण हा Music च्या साम्याबद्दल तरी धाडस करून नौशादांनाच पत्र लिहिलं. पण नौशाद एवढे मोठे संगीतकार असून

सुद्धा त्यांनी या पत्राची दखल घेऊन उत्तरही लिहिले. ते म्हणतात बिघडलं काहीच नाही. कलाकाराला आपल्या कलाकृतीसाठी प्रेरणा हवी असते. प्रेरणेशिवाय कलाकृती जन्माला येतच नाही. हो पण बाकीचा खुलासा हा ज्याचा त्याचाच लागतो. थोर- कलाकार थोर माणसे ही विचारांच्या पातळीवरही थोरच असतात! श्री. कालगावकरांसाठी त्यांचे हे पत्र म्हणजे अनमोल ठेवाच ठरलं!

अशी आठ वर्षे गेली आणि मार्च 2000 मध्ये एक छान योग जुळून आला. श्री. कालगावकर सरांच्या जीवनातील तो एक सोनेरी दिवस होता. संगीतकार श्री. नौशादांच्या भेटीचा तो दिवस! वयाची 80 वर्षे पूर्ण केल्या निमित्त श्री. नौशाद यांचा सत्कार ज्येष्ठ गायिका गंगूबाई हनगल यांच्या हस्ते केशवराव भोसले नाट्यगृहात आयोजित केला होता. एका ज्येष्ठ शास्त्रीय संगीत गाणाऱ्या गायीकेकडून एका चित्रपट संगीत दिग्दर्शकाचा सत्कार व्हावा. म्हणजे कुठलेही संगीत असूदे ते श्रेष्ठ असते याची प्रचिती येते. चित्रपटातील गाणी त्यातील शब्दांमुळे मनाला भिडतात. शिवाय उत्तम चाल व गोड आवाज हे तर आनंद देणारे असतेच. शास्त्रीय संगीत जरी सगळ्यांना समजेल असे नसले तरीही ते कानातून हृदयापर्यंत पोहचतेच. व ते ऐकतांनाही तल्लीन व्हायला होते.

मध्यंतरात नौशादांच्या भोवती लोकांचा गराडा होता. श्री. कालगावकरही मित्रांसोबत पुढे झाले. त्यांनी नौशादांचे पत्र बरोबर नेले होते. ते पुढे केले. आपल्या छंदाबद्दल त्यांना सर्व सांगितले. व आपल्या घरी संग्रह बघायला यावं व काही गाणी ऐकावी अशी विनंती केली.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. नौशाद साहेब येतील की नाही ही धाकधूक कालगावकरांना होतीच. एवढ्या मोठ्या व्यक्तीला अशी सवड काढणे अवघडच. पण नौशाद आले. त्यांनी अनंतराव दिक्षीतांना सांगितले मला श्री.कालगावकरांचेकडे जायचे आहे. कालगावकरांना हा निरोप मिळाला. त्यांनी पत्नीच्या मदतीने नौशादांच्या सर्व रेकॉर्डस् हॉलमध्ये मांडल्या. श्री. नौशादांना घेऊन सर वरती आले व त्यांच्या स्वागतासाठी ठेवलेली रेकॉर्ड लावली. हे अनोखे पण आनंद देणारे स्वागत नौशादांना खूपच आवडले. नौशाद हॉलमध्ये सरांच्या जवळ बसले. सरांनी त्यांना काही गाण्याच्या रेकॉर्डस् ऐकवल्या. त्या नौशादांच्याकडेही नव्हत्या. अर्धा तासच वेळ असणारे नौशाद दोन तास बसले. उठण्यापूर्वी दास्तांमधील नागन नृत्याची रेकॉर्ड त्यांनी स्प्रिंगच्या ग्रामोफोनवर ऐकली. व पुन्हा पुन्हा कालगावकरांच्या संग्रहाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

हा दिवस कालगावकरांच्या जीवनातील कधीही न विसरणारा दिवस ठरला. कसे असते नां एखाद्या माणसाची भेट आयुष्यात एकदा जरी झाली तरी ती कधीही न विसरणारी ठरते व जेव्हा- जेव्हा तिची आठवण येते तेव्हा- तेव्हा ती आठवण खूप आनंद देऊन जाते!

प्रा.श्री.ज.कालगांवकर, 9881468643

सध्या सरांच्या संग्रहात अदमासे साडेचार हजार रेकॉर्डस्, सहा ग्रामोफोन्स व पंचावन्न रेकॉर्ड प्लेयर्स आहेत. सर्व सुस्थिती ठेवणे हा सरांच्यासाठी फुल टाईम जॉबच झाला आहे.

# सावरकरांची मार्सेलिस उडी

सावरकर हे लहानपणापासूनच अत्यंत तीव्र बुद्धीचे होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. प्राथमिक शिक्षण संपल्यावर ते पुढील शिक्षणासाठी फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथूनच त्यांनी B.A. ची पदवी घेतली. पुढे बॅरिस्टर होण्यासाठी 1906 साली त्यांनी इंग्लंडच्या भूमीवर पाऊल ठेवले. बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी अभ्यासाला सुरुवात केली. इंग्लंडच्या वातावरणातील स्वातंत्र्याचा वारा ते मनसोक्त प्याले. लेखन व वाचन याला त्यांनी जोमाने सुरुवात केली. वाचनालयात यांचे तासन् तास जाऊ लागले. तात्यारावांनी अभिनव भारतची शाखा खुद्द लंडनमध्ये स्थापन केली. सभासदांना पिस्तुलाचा परिचय करून देण्यात आला. बॉम्ब तयार करण्याची विद्या येऊ लागली. गुप्तपणे भारतात पिस्तुले पाठवण्यास सुरुवात झाली.

जोसेफ मॅझिनीचे चरित्र प्रसिद्ध करून तात्यारावांनी ते लोकमान्य टिळक व काळकर्ते परांजपे यांना अर्पण केले. १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा अपूर्व ग्रंथ लिहिला. प्रकाशनापूर्वीच जप्त करण्यात आला. परंतु भारतात त्याचा गुप्तपणे प्रसार झाला. हा ग्रंथ म्हणजे क्रांतिकारकांची अमरगाथा ठरली.

भारतात राजकीय चळवळीचा डोंब उसळला. पूज्य लाला लजपतराय यांना हद्दपारीची शिक्षा झाली. ही बातमी विलायतेत समजताच तात्यारावांचे सहकारी सेनापती बापट यांनी ब्रिटिश पार्लमेंटवर बॉम्ब टाकण्याचे ठरविले. पण तात्यारावांनी त्यांना सबुरीचा सल्ला दिला.

भारतातील ब्रिटिशांच्या जुलूमाच्या कहाण्या ऐकून इंग्लंडमधील भारतीयांना चीड येऊ लागली. मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा भर लंडनमध्ये वध केला. ही घटना दि. 1 जुलै 1901 रोजी घडली. मदनलाल धिंग्रा हे तात्यारावांच्या बैठकीतले होते. त्यामुळे ब्रिटिश सरकारची करडी नजर तात्यारावांचेकडे वळली. मदनलाल धिंग्रा यांनी देशभक्तीने प्रेरित होऊनच वायलीचा खून केला असे सावरकरांनी सांगितले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने सावरकरांच्या चळवळीवर बंधने आणली.

या अडचणीतून सुटण्यासाठी एक युक्ती काढण्यात आली. दसऱ्याचा धार्मिक समारंभ सभा भरवून साजरा करण्याचे ठरले. पण याचे अध्यक्षपद कोण घेणार. महात्मा गांधी धैर्याने पुढे आले व त्यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. सभेला 100 ते 150 स्त्री-पुरुष आले होते. सावरकरांनी आपल्या भाषणात भारतीयांच्या ऐक्य भावनेचे महत्त्व सांगितले. गांधीजींनी सावरकरांच्या भाषणाचा गौरव केला.

क्रांतिकारकांच्या लंडनमधील हालचाली सावधपणे सुरू झाल्या. विलायतेतून पाठविलेली पिस्तुले हिंदुस्थानात पोहचली. दडपशाही सारखी वाढतच होती. अभिनव भारताची संघटना ब्रिटिश सरकारच्या नजरेत आली. क्रांतिकारकांचा समूळ उच्छेद करण्याचा सरकारने चंग बांधला.

याचवेळी तात्याराव लंडनमध्ये आजारी पडले. प्रकृती स्वास्थ्यासाठी ते फ्रान्सला गेले पण परत लंडनला आल्यावर त्यांना अटक करण्यात आली. त्यांना सोडविण्याचे क्रांतीकारकांनी अथक प्रयत्न केले. पण त्यात यश आले नाही. त्यांच्यावरील खटला चालविण्यासाठी त्यांना हिंदुस्थानात परत पाठविण्याचे सरकारने ठरविले. त्याप्रमाणे 'मोरिया' बोटीतून कडक पहारा ठेवून त्यांना हिंदुस्थानात परत पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. प्रवास सुरू होताच बोटीवरून पळून कसे जावे या दृष्टीने सावरकर विचार करू लागले. या विचाराचा आपल्या बरोबर असलेल्या पार्कर व पॉवर या पोलिस अधिकाऱ्यांना थांगपत्ता लागू नये म्हणून ते युरोपीय पद्धतीचा रुबाबदार पोशाख करून भोजनगृहात जात व सहप्रवाशांबरोबर गप्पा मारण्यात रंगून जात.

ती बोट विलायतेहून आठ एक दिवसांनी फ्रान्सच्या किनाऱ्यावर मर्सेलिस येथे थांबली होती. ही संधी साधून सावरकरांनी शौचकुपाच्या वरील खिडकीतून समुद्रात उडी मारून पळण्याचा धाडसी प्रयत्न केला. विशाल सागरातून सपासप अंतर कापीत निघाले. खिडकीतून उडी मारतांना त्यांच्या बरगड्याच्या कातडीची साले निघाली. पण सावरकरांनी तिकडे लक्षही दिले नाही. ते पळाल्याची बातमी बोटीवर

कळल्यावरून पोलिसांच्या बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव सुरू झाला. पण सावरकरांनी त्याला दाद दिली नाही. पोहत - पोहत ते धक्याजवळ आले, आणि तो चढून ते पळू लागले. ब्रिटिश शिपाईही त्यांच्या मागोमाग पळत येत होते. वाटेत सावरकरांना एक फ्रेंच शिपाई भेटला. आपल्या मोडक्या- तोडक्या फ्रेंच भाषेत सावरकर त्याला आपल्याला पोलिस चौकीवर नेण्यास सांगू लागले. हेतू हा की एकदा का त्या फ्रेंच शिपायाने आपल्याला ताब्यात घेतले की आंतरराष्ट्रीय निर्बंधाप्रमाणे ब्रिटिश शिपायांना त्यांना पकडता आले नसते. पण सावरकरांचे बोलणे काही केल्या त्या फ्रेंच शिपायास समजेना. तेवढ्यात ब्रिटिश शिपाई तेथे पोहोचले. त्यांनी फ्रेंच शिपायाची मूठ दाबली. त्यावर त्या फ्रेंच शिपायाने सावरकरांना ब्रिटिश पोलिसाच्या हाती सोपविले. अशा रितीने ब्रिटिशांच्या हातावर तुरी देण्याचा सावरकरांचा धाडसी प्रयत्न विफल झाला! पण त्यांची ही उडी त्रिखंडात गाजली.

सावरकरांना ब्रिटिश शिपायाकडे सोपविल्यामुळे फ्रेंच सरकारवर कडाडून टीका झाली. आश्रय मागण्याच्या अधिकाराचा या प्रकरणात भंग झाला होता.

फ्रान्सने ब्रिटनला असे कळविले की मार्सेलिस प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईपर्यंत सावरकरांवरील खटल्याचे काम तहकूब करावे. पण असे झाले नाही. ब्रिटिश सरकारने याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. सावरकरांच्यावर खटला उभा राहिला, आणि त्यांना काळया पाण्याची शिक्षा झाली!

# गोरज

श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यासहित गाईंना घेऊन रानात जायचे. गाई रानात दिवसभर निवांतपणे चरत असत. श्रीकृष्ण झाडाखाली बसून बासरी वाजवण्यात दंग! गाई पण चरत असतांना कान टवकारुन बासरी ऐकायच्या. सवंगडी पण श्रीकृष्णाच्या आगे- मागे असत. त्यांच्यासाठी तर हे सर्व आनंददायी असायचे. सूर्य अस्ताला जायच्या वेळी सगळेच घराच्या ओढीने परतू लागत. गाव जवळ आल्यावर गाईंच्या चालण्यामुळे उडत असलेली धूळ सगळयांना दिसायची हीच तर ती गोरज वेळ!

या गोरज मुहूर्तावर काही शेतकरी आपल्या मुला-मुलींचे विवाह संपन्न करतात. संध्याकाळी शेतकरी वर्ग थोडा निवांत असतो. त्यामुळे शुभकार्यासाठी त्यांना गोरज मुहूर्त सोयीचा वाटतो. प्रत्येकाचा रोजचा दिनक्रम पाहिला तर सकाळपासून उत्साहाने सर्व काही करणारी व्यक्ती संध्याकाळी थकलेली असते. सकाळचा चढता उत्साह संध्याकाळी मावळतो. ही रोजची संध्याकाळ थोडी- फार निरुत्साहाची असते.

सूर्य अस्ताला जाताना लाल गोळा नेत्राला सुखावतो. तो सूर्य बुडल्यावर थोडासाच अंधुक प्रकाश राहतो. ती वेळ मनाला उदासीनता आणणारी असते. असेच असते आयुष्याच्या संध्याकाळचेहि! ही आयुष्याची संध्याकाळ म्हणजेच वृद्धापकाळ! बालपण, तरुणपण कसे गेले कळतहि नाही. पण वृद्धापकाळ सरता

सरत नाही. संध्या- छाया भिवविती हृदया! कितीही मनाची तयारी केलेली असली, अध्यात्म वाचलेले असले तरी ही कातरवेळ सोपी नसते. वृद्धांनी ती जाणीवपूर्वक सोपी करावी लागते.

सूर्य अस्ताला गेल्यावर थोडासाच अंधुक प्रकाश राहतो. ती वेळ मनाला उदासिनता आणणारी असते. म्हणूनच हीच वेळ साधून घरात देवापाशी दिवा लावला जातो. शुभंकरोती म्हटले जाते. म्हणजे मग घरातले वातावरण शांत सुगंधित होते. तसेच आपले मनहि या कातर वेळेतून बाहेर येते.

वृद्धांच्या बाबतीत तर हा गोरज काळ खूप वर्षांचा असतो. तो नेहमी आनंदी टवटवीत ठेवायला हवा. वृद्धांनी कसे वागावे या संबंधी अनेक टिप्स व्हाट्सऍपवर येत असतात.

वृद्धापकाळ हा निरसवाणा जाऊ नये हा प्रयत्न मात्र प्रत्येक वृद्धाने करायलाच हवा. काही घरी वृद्धांसहित सगळेजण एकोप्याने नांदत असतात. वृद्धपण आपल्या परीने सक्रिय असतात. त्यामुळे घरच्या तरुण पिढीला त्यांचा अडसर, अडथळा वाटत नाही. पण काही घरी वृद्धांची सर्व जबाबदारी तरुण मुलांच्यावर आलेली असते. वृद्ध लोक मागे पडून तरुण पिढी आली की आपल्या मताप्रमाणे संसार करतात. त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची मते याला प्राधान्य मिळते. मग आपोआपच वृद्ध बाजूला पडतात. त्यामुळे ते एकाकी होतात. सर्वांपासून तुटले जातात. तरुण पिढी मुद्दाम असे करते असे नाही. पण असे घडते म्हणून ही कातरवेळ, हा गोरजकाळ कसा आनंदी होईल हे कटाक्षाने पाहिले पाहिजे.

मी अनेक वृद्ध पहात आहे. काही वृद्ध एकाकी पडतात. जोडीदार पुढे निघून गेल्यामुळे! व त्यांचे जगणे थोडेफार निरसवाणे होते. त्यांच्या जीवनात पोकळी निर्माण होते. आपण जर अध्यात्म वाचले असेल आणि ते अंतकरणात बिंबले असेल तर काही प्रसंगात आपण आपल्या विचाराने मनाला आवरु शकतो. आपले उर्वरित आयुष्य सुखा समाधानत सक्रिय राहण्यात घालवू शकतो. अशा अनेक गोष्टी आहेत की आपण इतके दिवस त्या करू शकलो नसतो त्या कराव्यात. कुठल्याही प्रसिद्धीसाठी नाही तर केवळ स्वतःच्या आनंदासाठी! मन आनंदी असेल तर शरीर निरोगी राहते.

मी काही वृद्धाश्रम पाहिले. पैसे देऊन राहात असण्यामुळे वृद्धांना तिथे काहीच काम नसते. पण या वृद्धांनी सुद्धा चालकांना विचारून काही ना काही काम करावे. जे वृद्ध अंथरुणावर झोपून असतील त्यांची गोष्ट निराळी. पण हिंडता फिरत्या वृद्धांनी स्वस्थ बसू नये. वाती वळणे, गोधड्या शिवणे, फुलांचे हार करणे असे अनेक उद्योग ते करू शकतात. आपण काहीतरी करू शकतो. दुसऱ्याच्या उपयोगी पडू शकतो ही भावना ही कृती जगण्याचे बळ देते.

सामुदायिकरित्या भजने, गाणी म्हणणे असेही कार्यक्रम करू शकतो.

घरी असलेल्या वृद्धांची तऱ्हा वेगळीच असते. घरातील पिढी आपल्या कामात मग्न असते. वृद्धांना काम नसते. त्यांच्याशी प्रेमाने गप्पागोष्टी करण्यासाठी इतरांना वेळ नसतो. म्हणून तर घरी राहिलेल्या वृद्धांनी आपले विश्व निर्माण करावे. कुठल्याही गोष्टीची खंत करीत बसू नये. नवीन आलेले तंत्रज्ञान थोडे शिकून घ्यावे. म्हणजे व्हाट्सअॅप, फेसबुक वगैरे. याव्दारे आपण मित्र-मैत्रिणींशी कनेक्ट राहू शकतो. मी

तर म्हणते व्हाट्सॲप हे वृद्धांना वरदानच आहे. लेखनाची आवड असणाऱ्यांनी लेखन करावे.

वृद्धापकाळी आपण कशा प्रकारे जीवन जगावे याचा विचार आधीच करून ठेवायला हवा. कुठलेही नियोजन असेल, मनाशी त्याबद्दल संवाद केलेला असला तर संध्याकाळ सुद्धा आनंदातच जाईल हे निश्चित!

वृद्धापकाळ हा काही एकदम येत नाही. हळूहळूच येतो. मग त्याचे नियोजन का नसावे! वृद्धांच्याकडे अनुभवाची शिदोरी मोठी असते. घरच्या तरुणांना ती आवडत नसेल तर त्यांना नका सांगायला जाऊ. बाहेर जग मोठे आहे. तेथील गरजू तरुणांना त्याचा लाभ करून द्या. पिकते तिथे विकत नाही. त्यामुळे घरच्यांना आपल्या अनुभवाचा शहाणपणा नको सांगायला. पण योग्य व्यक्तींना त्याचा लाभ करून दिला तर तेही एक मोठे समाजकार्यच आहे. त्यामुळे आपोआपच तुम्हा बद्दल बाहेर लोकांना आदर, प्रेम निश्चित वाटेल. जगण्यात ओढ राहिली तर वृद्धापकाळ संध्याकाळ निश्चितच निराशेचा जाणार नाही.

वृद्धापकाळी भेडसावणारा प्रश्न म्हणजे अनारोग्याचा. पण आता शरीर विज्ञान खूप पुढे गेले आहे. आपण त्याचा लाभ घ्यायला हवा. आरोग्याची काळजी आपली आपणच जर घेतली तर आपण निश्चितच धडधाकट राहून वृद्धापकाळ ही गोरजवेळ उत्तम घालू शकू!

# प्रसाद

आपण देवाला अभिषेक सांगतो, तीर्थयात्रेला जातो तिथे देवाला अभिषेक करतो. आपल्याला अभिषेकाचा प्रसाद मिळतो. प्रसादाचे आपल्याला खूप अप्रूप असते. आपण तर तो प्रसाद तिथे घेतोच पण घरीही आणतो. हेतू हा आहे की तो घरातील सर्वांना मिळावा. काशी, तिरुपती इकडे जाऊन आल्यावर मिळालेला प्रसाद आपण घरी तर आणतोच. पण शेजाऱ्यांनाही देतो. देवाचा प्रसाद सर्वांना मिळावा हीच इच्छा असते. प्रसाद ग्रहण करताना जो आनंद मिळतो तो वेगळाच आहे. ज्यांना आपण तो देतो त्यांना पण खूप आनंद मिळतो. सगळयांनाच या तीर्थयात्रांना जाणे जमत नाही. त्यांना घरच्या घरीच प्रसाद मिळाला यात समाधान मिळते.

श्री गोंदवले क्षेत्र, नौबाग, शेगाव, शिर्डी येथे वार्षिक उत्सव असतात. लोक दर्शन व नंतर मिळणाऱ्या प्रसादाचे जेवण यासाठी आवर्जून जातात. प्रसादाच्या जेवणाची रुची दुसऱ्या कशालाही येत नाही. असे तृप्त होऊन म्हणतात.

अशाच एका तीर्थक्षेत्री प्रसादासाठी रांग लागलेली असते. एका वृद्ध महिलेला नंबर आल्यावर प्रसादाचा लाडू मिळतो. बाहेर आल्यावर ती त्या लाडवाचा थोडा तुकडा खाते व रांगेतील एका छोट्या मुलाकडे तिचे लक्ष जाते. ती आजी तो उरलेला लाडू त्या मुलाला देते व म्हणते अरे बाळा, तुझा नंबर यायला

वेळ लागेल तेव्हा तू हा माझा उरलेला लाडवाचा प्रसाद घे व घरी जा. त्या मुलाला आनंद होतो व घराकडे धूम पळतो.

जमखंडीला 1940 च्या सुमारास असलेल्या पटवर्धन सरकारांनी त्यांच्या टेकडीवर असलेल्या रामतीर्थ मंदिरात 21 वर्षे प्रत्येक श्रावण महिनाभर भोजन घातले. तिथे प्रसादासाठी अनेक लोक जायचे तृप्त होऊन यायचे.

आस्तिक माणसाची देवावर खूप श्रद्धा भक्ती असते. त्याच्या सगुण दर्शनाने, प्रसादाने तो आनंदी होतो. त्याला मानसिक समाधान लाभते.

सध्याचा काळ असा आला आहे की याबाबतीत आपण थोडा वेगळा विचारही करायला हवा. तीर्थक्षेत्री भक्त आले म्हणजे त्यांची निवासाची, भोजनाची व्यवस्था तेथील कमिटीला करावी लागते. त्यासाठी लागणारे स्वयंसेवक आता पूर्वीसारखे उपलब्ध होत नाहीत. मग हा सर्व कामाचा भार थोड्या स्वयंसेवकावर पडतो. त्यांना उत्सव यथासांग पार पाडणे कष्टाचे होते. लोकांना देवदर्शन व प्रसादाचे जेवण एवढेच हवे असते. इतर कुठलाही विचार ते करत नाहीत.

घरी बसून सुद्धा आपण देवाचे ध्यान करू शकतो व घरच्या अन्नाचा नैवेद्य दाखवून प्रसाद म्हणून ते ग्रहण करू शकतो. संत तर हेच सांगतात. आपली भक्ती इतकी तीव्र हवी की भगवंतच आपल्या भेटीला येईल. असा विचार करणारे लोक कमी असतात.

आपले जे कोणी गुरू असतील त्यांना आपल्या हृदयात स्थान द्यावे. त्यांची मनोभावे रोज मानसपूजा करावी. ही मानसपूजा गुरुपर्यंत निश्चितच पोहोचते. आपल्यालाही समाधान मिळते. दिवसभराचे काम नंतर आपण सचोटीने करावे.

माझ्या पाहण्यात एक आजी होत्या. त्या रोज घरच्या देवाची यथासांग पूजा करायच्या. देवाला घरी केलेल्या स्वयंपाकाचा नैवेद्य दाखवायच्या. नैवेद्याच्या ताटातील प्रसाद म्हणून थोडे आपल्यासाठी ठेवायच्या व ते ताट रोज मोलकरणीच्या मुलांना द्यायच्या. किती सुंदर कार्य! अशा आजींना खरे भक्त म्हणता येईल.

श्री समर्थ तर दासबोधात सतत सांगतात अरे तीर्थक्षेत्री जाण्याची खटपट करू नकोस. प्रपंच नेटका करताना परमार्थ समजून घे. दुसऱ्यालाही आपल्यासारखेच पहा. समाजामध्ये जागृती कर. लोकांना प्रपंच करीत परमेश्वर भक्तीला लाव. श्रीराम हा सर्व गोष्टींचा कर्ता आहे हे समजून घे. त्याचे सतत स्मरण कर.

रोज आपण जेवण करतो तो भगवंताचा प्रसाद असतो. तो जर आपण त्या भावनेनेच खाल्ला तर मनही समाधानी होईल. शिवाय आपल्या मनात जेवण तिखट होते, खारट होते असल्या भावना येणारच नाहीत. सर्व पदार्थ उत्तम झाले आहेत असेच समजून आपण ते खाल्ले की ते आपल्या अंगीही लागेल. शिवाय जिने हा स्वयंपाक केला असेल तर तिलाही समाधान मिळेल.

गणपतीची पूजा करणाऱ्या एका गुरुजींनी मला सांगितले हे बघा ताई आपल्याला जे आवडतेना ते आपण देवाला दाखवायचे. व नंतर प्रसाद म्हणून मी ते खातो. एकेकदा मला पेपरमिंटच्या गोळ्या खाव्या असे वाटते. मी त्याच देवाला दाखवतो. आजूबाजूला असलेल्या मुलांना एकेक देतो व मीही खातो. मला तर ते एकदम पटले. माझ्या सासूबाई तर चहाचा सुद्धा नैवद्य देवाला दाखवायच्या. देवाला दाखवलेला चहा पिण्यात त्यांना आनंद वाटायचा. खरंच आपण जे- जे भक्तिभावाने करतो ना ते- ते प्रसाद म्हणून आपल्याला परत मिळते. अन् मग ते अधिक रुचकर

लागते. आपण अनेक देवळे निर्माण केली. व खऱ्या देवाला विसरलो. देवळातल्या देवाचे दर्शन आवर्जून घ्यायला जातो. तिथे प्रसाद म्हणून मिळालेली खडीसाखर भक्तिभावाने खातो व घरी आईने केलेल्या स्वयंपाकाला नावे ठेवत बसतो. तेच अन्न जर आपण प्रसाद म्हणून खाल्ले तर किती समाधान मिळेल!

आजकाल तरुण स्त्री-पुरुष अनेक कारणे पुढे करून आपल्या आई वडिलांना वृद्धाश्रमात केअर सेंटरमध्ये ठेवतात. आई- वडिलांनी मुलांसाठी घेतलेले कष्ट, त्यांना दिलेले प्रेम सोयीस्कररित्या मुले विसरतात. अशांनी जरी रोज देवाची पूजा करून प्रसाद खाल्ला तरी त्यांना प्रसादापासून मिळणारा लाभ कसा मिळणार? आई- वडिल हेच खरे तीर्थ- प्रसादासारखे असतात. तेव्हा ते कसे आनंदी राहतील हे पहा. अशा वागण्यामुळे देव नक्कीच संतुष्ट होईल. व तुम्हाला घरचे जेवण प्रसादासारखेच लागेल.

आयुष्यातले अनेक प्रसंग आपण देवळातल्या प्रसादासारखेच मानायला हवेत. जे- जे वाट्याला आले ते आपल्या इष्टाचा प्रसाद मानले कि सारी घालमेलच संपते. परमार्थ वेगळे काय सांगतो हो. आयुष्यातला प्रत्येक क्षण हा भगवंताचा प्रसाद म्हणून स्वीकारता आला तर सारे तणाव, सारा वैताग संपून जाईल. जगणे आनंदी होईल. देवळातला मिळालेला प्रसाद आपण कण- कण सर्वांना वाटतो तसे आपण आयुष्यात कमावलेली संपत्ती-धन वाटायला शिकले पाहिजे. श्रीकृष्णांनी सांगितलेला कर्मयोग हेच सांगतो.

# टाळी

माझी मैत्रीण सांगत होती तिच्या मित्राने आपली सर्व हकीगत सांगून तिची टाळी मिळावी म्हणून हात पुढे केला. मैत्रिणीने त्याला टाळी दिली. त्या टाळी मधून ती म्हणते मला त्याची आपुलकी, जिव्हाळा आणि माझ्या प्रती असलेला प्रेमादरही समजला. त्याच्या टाळी मधून अनेक भावना मैत्रिणीला कळू शकल्या कशी आहे ना ही  टाळी! न बोलता अनेक गोष्टी सांगून जाणारी! सगळं शब्दातून सांगायला पाहिजे असं नाहीच. टाळीमुळे मिळालेल्या स्पर्शातून अनेक भावना आपण दुसऱ्यापर्यंत पोहोचवू शकतो.

अगदी तान्हे असतांना सुद्धा मूल रडायला लागलं की आई टाळी वाजविते. त्या ध्वनीच्या आवाजाने मूल रडायचे थांबते. टाळीचा अगदी लहान वयातच आपल्या जीवनात प्रवेश होतो.

थोडेसे मोठे झाल्यावर आई मुलाचे दोन्ही हात पकडून हातांचे तळवे एकमेकांवर ठेवून टाळी वाजवायला शिकवते व स्वतः विठ्ठल विठ्ठल म्हणते म्हणजे या विठ्ठलाच्या नावाचा संस्कार बालमनावर एवढ्या लहान वयातच होतो.

हे लहान मुल पण या संस्कारामुळे टाळी वाजवायचा प्रयत्न करते व त्यात रंगून जाते त्यावेळी त्याचा तो निरागस आनंदी चेहरा पाहण्यासारखा असतो.

पुढे शाळेत जायला लागल्यावर विद्यार्थी शिक्षकाकडे लक्ष देत नसेल तर ते टाळी वाजवून त्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतात.

एखाद्याला प्रोत्साहन द्यायचे असेल तर आपण टाळ्या वाजवतो. एखाद्याचे भाषण आवडले की आपण टाळीचा कडकडाटच करतो.

मित्र-मैत्रिणी एकत्र जमले की हास्याचे फवारे उडतात, दिलखुलास गप्पा चालतात व त्यात एकमेकांना टाळी देणे होते. त्यावेळी त्या मुलांचा आनंद ओसंडून वाहतो.

तरुण-तरुणींचं प्रेम जमतं. एकमेकांचे हात घट्ट धरून चालणं होतं व मग त्यांच्या लग्नाची टाळी वाजते.

गणपती उत्सवात तर गणपतीची आरती करतांना मोठ्या आवाजात म्हणणे व त्यासोबत मोठ्यांदा टाळीचा नाद करणे हा तर आनंद देणाराच असतो.

एखाद्या गायकाचं गाणं ऐकायला गेलो असतांना त्याच्या प्रत्येक गाण्यांवर आपण टाळ्या वाजवतो. गायकालाही तो टाळीचा नाद सुखावून जातो.

एखाद्या कार्यक्रमास आपण प्रमुख अतिथी बोलावतो. ते स्टेजवर स्थानापन्न झाले की आपण टाळयांचा गजर करून त्यांचे स्वागत करतो.

पंढरपूर वारीत दिंडीत टाळ वाजवत जाणाऱ्या वारकऱ्यांना खूप महत्त्व असते. पण याच वारकऱ्यांच्या मागे त्याच ठेक्यात टाळी वाजवत अभंग म्हणत जाणारे वारकरीही आपल्याला भावुक करतात.

वाढदिवसाच्या वेळी केक कापताना टाळ्या वाजवितोच पण हा कितवा वाढदिवस असे विचारून तितक्या टाळ्या वाजवतो.

जेव्हा दोन लोकांचा वाद चाललेला असतो तेव्हा आपण म्हणतो एका हाताने टाळी वाजत नाही. बरे!म्हणजे या टाळीचा उपयोग, वापर आपण किती ठिकाणी करतो ना?

अजय- अतुलच्या गाण्यात तर संपूर्ण संगीत या टाळयावर आधारलेलं आहे. ए.आर.रेहमान यांनी सुद्धा सुरुवातीच्या काही गाण्यात या टाळयांचा खूबीने वापर केला आहे.

टाळी ही आपल्या आयुष्यात कायम नाद रूपात घर करून असते.यामुळे आपल्याला निश्चितच आनंद मिळतो. टाळी वाजवताना दोन्ही तळहातावर ऍक्युप्रेशर पॉईंट्स दाब्लेजातात.हा तर आरोग्य उत्तम राहण्यासाठीचा महत्वाचा उपयोग.मी व माझी मैत्रिणया प्रेशर पॉइंटससाठी रोज सकाळी एक हजार टाळया वाजवत होतो.

अशा तऱ्हेने टाळी हा आपल्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे.

आयुष्याची शेवटची घटिका आली की ही टाळी मंदावते. शरीर मन कोणीच साथ देत नाही.

आपलं पार्थिव स्मशानाकडे जाताना मागे काही लोक जय जय राम कृष्णहरी म्हणत हलक्या आवाजात आपल्यासाठी शेवटची टाळी वाजवतात.

# एकेकाचे अध्यात्म

सुमा माझ्याकडे घरी भांडी व कपडे धुण्याचे काम गेली 7 – 8 वर्षे करीत आहे. सुमाच्या घरी तिचा नवरा व दोन मुले असा छोटा संसार. मुले शाळेत जाणारी. नवराही कामाला जायचा. सुमा पांच घरी धुण्या – भांड्याचे काम करायची. ती सर्व घरी तिचे काम अतिशय नीटनेटके करायची. तिची लखलखीत घासलेली भांडी व स्वच्छ धुतलेले कपडे यामुळे सगळया मालकिणी खूष असायच्या. मला एकदा सुमा म्हणाली – ताई मी कुठल्याही देवाला जात नाही. सर्वांच्या घरी धुणे – भांडी ही कामे नीट करणे त्यात कुठलीच कुचराई न करणे हाच माझा देव! माझं स्वच्छ काम बघून मालकिणीही माझ्यावर खूष असतात हो ताई! मी न मागताच माझ्या मुलांना काही बाही देत असतात. मला तर स्वच्छ काम करण्यातच आनंद वाटतो. परवा तुमच्या घरी आलेले गुरुजी मला म्हणत होते, अगं सुमा तू पण तुझ्या घरी घाल ना सत्यनारायणाची पूजा! मी येईन पूजा सांगायला. ताई खरं सांगू का मला एवढा वेळच नाही. काम करणं हीच माझ्यासाठी पूजा आहे. सुमाचे ते विचार ऐकून चाट पडायची वेळ माझ्यावर आली! सुमानं अनुसरलेलं हे अध्यात्म कुणालाही विचार करायला लावणारंच होतं.

गीतेत तरी भगवान श्रीकृष्णांनी वेगळे काय सांगितले आहे हो? प्रत्येकाने प्रारब्धानुसार आपल्या वाट्यास आलेले कर्म उत्तम रितीने सचोटीने करावे. कुठलेच काम श्रेष्ठ किंवा किंवा कनिष्ठ नसते. ते आपण किती मनापासून करतो त्यावर त्याचे

यश अवलंबून आहे. गोंधळलेल्या अर्जुनाला तर श्रीकृष्ण सांगतात अरे पार्था, असा गोंधळू नकोस ज्यांच्यावर बाण चालवायचा आहे, ते माझे गुरु, बंधू आहेत हा विचार सोड. युद्ध करणे हेच तुझे कर्म आहे. स्थितप्रज्ञ हो तुझ्या मनाला आवर. हाच तर कर्मयोग!

आपल्याकडे संतांची परंपरा आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, श्री. एकनाथ व श्री समर्थ रामदास हे चार संत तर वेद मानले जातात. सर्व संतांनी आपल्याला परमेश्वर भक्तीच सांगितली. श्री समर्थ रामदास मात्र थोडे वेगळे संत होते. त्यांनी दास बोधासारखा अलौकिक ग्रंथ लिहिला. परमेश्वर भक्ती ही तर त्यांनी सांगितलीच आहे. पण प्रपंची माणसाला त्यांनी केलेला उपदेश अतिशय उत्तम आहे. प्रपंचात राहूनच अध्यात्म कसे अंगी बाणवावे हे वेगवेगळी लक्षणे सांगून समजावले आहे. आपल्या देहावर आपले विलक्षण प्रेम असते. पण या देहाकडून ज्या – ज्या क्रिया करवून घेतल्या जातात त्याचा कर्ता श्रीराम आहे हे विसरू नका. त्या परमात्म्याला एकदा आपण जाणले की सर्व काही मी केले हा अहंकार गळून पडतो.

श्री समर्थांच्या वेळी देशाची परिस्थिती वाईट होती. राजा मुसलमान होता. जनतेवर जुलुम जबरदस्ती चालली होती. अशा वेळी लोकांना जागृत करणे अतिशय आवश्यक होते. म्हणून समर्थांनी भारतभर हिंडून अकराशे मठ स्थापले. या मठावर तरुण महंत नेमलेला मठ सांभाळणारा महंत कसा असावा याबद्दलही दासबोधात सांगितले. श्री समर्थांनी प्रयत्नवादाला अतिशय महत्त्व दिले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांनी प्रेरणा दिली. हाच राजा महाराष्ट्राला तारून नेईल याची त्यांना खात्री होती. म्हणून त्यांनी राजकारण या विषयावरही समास लिहिले.

पण बऱ्याच समासांचे सार भगवद्भ भक्तीकडेच नेते. प्रपंच हा वैराग्याने केला तर परमार्थ साधतोच. घडलेल्या सत्य घटनेवर आधारित मी नुकतेच व्हॉट्सऍपवर दोन व्हिडिओ पाहिले.

एक नागपूरच्या 83 वय असलेल्या आजींचा! या आजी गेली कितीतरी वर्षे लहान-मोठे स्वेटर्स विणतात. आजपर्यंत त्यांनी आपल्या आयुष्यात 20,000 स्वेटर्स विणले. ते सर्व त्यांनी राष्ट्रसेविका समितीच्या मार्फत गोर गरीब अनाथ लहान मुले, स्त्री, पुरुष यांना भेट म्हणून दिले. त्या म्हणाल्या हीच माझी ईश्वरपूजा! मी आता जरी 83 वर्षांची आजी झाले आहे तरी जोपर्यंत माझ्याकडून विणण्याचे काम होईल तोपर्यंत मी ते करत राहणार. त्यांचा मुलगा आजींना स्वेटरसाठी लागेल ती लोकर, सुया आणून देतो. म्हणजे त्याची तर मातेची पूजा व ईश्वरपूजा दोन्हीही! एकदा एक रिक्षावाला मला ठाण्याला भेटला. मी वयाने बरीच जेष्ठ असल्यामुळे एकटीने रिक्षातून कुठे जाणे जरा नकोच वाटायचे. पण रिक्षावाला अतिशय सज्जन माणुसकी असणारा होता. मला म्हणाला आजी, आरामात बसा तुम्ही सांगितलेल्या पत्त्यावर बरोबर सोडतो. तुम्हाला पाणी हवे का? मी माझ्या प्रवाशांसाठी पाण्याची बाटली ठेवतो. शिवाय माझ्याकडे चहाही आहे थर्मासमध्ये. याला पैसे नाहीत हं! प्रवाशांची सेवा. मी म्हटले अरे भाऊ तुम्ही हे का करता? तर तो म्हणाला मला प्रवाशांची सेवा करण्यात समाधान मिळते. यापेक्षा अध्यात्म ते निराळे काय असते हो?

आदरणीय बाबा आमटे यांचे आनंदवनातील काम आपण पाहिले आहेच. कुष्ठरोग्यांची त्यांनी केलेली सेवा ही ईश्वरी भक्ती इतकीच श्रेष्ठ आहे. त्यांनी या कुष्ठरोग्यांच्या सेवेतच भगवंताला पाहिले. दुसऱ्याचे दुःख जाणा, त्याला मदत करा,

त्याचे दुःख तुमच्या मदतीने हलके करा हे तर संतांनी सांगितले आहे. हे जर आपण जाणले तर आपण दुसऱ्यावरही नक्कीच प्रेम करू लागतो.

पूज्य सा.ने. गुरुजी हेच सांगतात “खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ' परार्थी प्राणही द्यावे जगाला प्रेम अर्पावे” यातच ते देवाला पाहतात.

दुसऱ्यासाठी काम करणारे आपल्या देशात अनेक कार्यकर्ते आहेत. सामाजिक संस्था आहेत. नुसते ऐहिक सुख भोगणे त्यांना आवडत नाही. त्यात त्यांना आनंद समाधान वाटत नाही. अशा सामाजिक भान असणाऱ्या लोकांमुळेच समाज तरुन जातो. ही त्यांची देवपूजाच असते.

तेव्हा आपला प्रपंच उत्तम रीतीने सचोटीने करायलाच हवा. पण तो करीत असतांना परोपकारही विसरू नये व सर्वांनाच बरोबर घेऊन त्या कर्त्या करवित्या रामाचे दास व्हावे असेच सद्गुरू समर्थ सांगतात!

# पुरुषाला मैत्रीण का लागते?

तसं पाहिलं तर हा विषय थोडा नाजूकच आहे. शिवाय तो अतिशय खाजगी पण आहे. असे असूनही मला वाटते तो विषय अभ्यास करावा असा आहे. कारण यामुळे कुटुंबावर परिणाम होतो. पर्यायाने काही घटस्फोटहि होतात. कुटुंब व्यवस्थेवर आघात होतो. म्हणजे हा विषय गंभीर नाही का?

स्त्री पुरुष या दोघांनाही मित्र-मैत्रिणी असणे खरंतर ही आवश्यकच गोष्ट आहे. दोघांमध्ये मैत्र असावं. मैत्र असणं ही भावना अतिशय चांगली आहे. पण मैत्री म्हटलं की त्यात आणखीही काही गोष्टी येतात. आणि मग त्या गैरसमजाला कारण ठरतात.

मी एक सत्यकथा सांगते. एक पती-पत्नी असतात. पति एका कंपनीत वरिष्ठ अधिकारी असतो. त्याचा खूप जवळचा मित्र असतो. तोही एका नावाजलेल्या कंपनीत काम करणारा. हा पतीचा मित्र पत्नीचाही मित्र होतो. पतीला कंपनीकडून परदेशी जाण्याची ऑफर येते. पती-पत्नी ही ऑफर स्वीकारतात. पत्नीला तिकडे नोकरी मिळत नाही. तिला सर्व खाद्य पदार्थ बनवण्याची आवड असते व त्यात ती कुशलही असते. तेव्हा ती स्वतःशी विचार करते व तिथे एक हॉटेल टाकायचे

ठरविते. ज्या ठिकाणी सर्व भारतीय खाद्यपदार्थ मिळतील असे ते हॉटेल, नवऱ्याचा या व्यवसायाला विरोधही नसतो आणि मदतही नसते. पण त्या मित्राला ही कल्पना खूप आवडते. तो मित्राच्या पत्नीला खूप प्रोत्साहन देतो. काही महिन्यांसाठी भारतातून तो त्यांच्याकडे येतो. केवळ मित्राच्या पत्नीला सर्व ती मदत करावी म्हणून! दोघेहि छान विचार-विनिमय करून हॉटेल सुरू करतात. दोघांच्या मधील असलेल्या निकट मैत्रीमुळे व दोघांमध्ये असलेला जिव्हाळा, आपुलकी विश्वास यामुळे एक छान कल्पना साकारली गेली. एक छान मैत्र जमलं. भारतातही ते अशा प्रकारचे हॉटेल पुढे जाऊन सुरू करतात. अशी मैत्री जीवनाला समाधानी आनंदी राखते.

पण आजकाल मी अनेक तरुण जोडपी पाहते. त्यांचे काही- ना काही कारणे घडून वाद होत असतात. लहान-सहान कारणेहि या वादाला पुरतात. पण या वादाचे मूळ जर शोधले तर माझ्या दृष्टीने ते वेगळेच असते. आपल्याला जीवन सुखा-समाधानाने जगण्याला जे काही लागते त्यात सुखी कामजीवन हा एक फार महत्त्वाचा भाग आहे. निसर्गाने पुरुषाला ही भावना स्त्री पेक्षा थोडी प्रबळ दिली आहे. त्यामुळे होते असे की स्त्री यातून लवकरच निवृत्त होते. पण तिच्या हे लक्षात येत नाही, की ती त्याकडे दुर्लक्ष करते. हे कळेना की आपल्या नवऱ्याला जे हवे आहे ते आपण दिले नाही तर त्याच्या एकंदर शारीरिक, मानसिक प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतील. त्याचा कोंडमारा होईल. तोंड मारून बुक्क्याचा मार ही म्हण येथे तंतोतंत लागू पडते.

मध्यंतरी मी एका मानसोपचार तज्ज्ञ बाईंचा एक व्हिडीओ पाहिला होता. तो सेक्स या विषयावरचा होता. त्यांनी सेक्स या विषयावर शास्त्रीयदृष्ट्या इतके छान विवेचन केले होते. त्या म्हणतात अशा स्त्रियांना वेळेवर मानसोपचार तज्ज्ञांकडे घेऊन जा. आम्ही शास्त्रीय दृष्ट्या त्यांना हे सर्व समजावून सांगू व जरूर असेल तर स्त्री रोग तज्ज्ञांचाही सल्ला घ्यायला सांगू. त्यांनी एका जोडप्याची हकीगत सांगितली. पत्नीने वयाच्या 45 व्या वर्षीच यातून निवृत्ती घेतली. बिचारा नवरा वयाच्या 50 व्या वर्षापासूनच तगमगत राहिला. असं वागून स्त्रिया त्या नवऱ्याचा कोंडमारा का करतात? कामवासना ही मर्यादेत असावी हे अगदी खरे पण निसर्गाने दिलेले सुख उपभोगण्यात काय गैर आहे?

आपल्या पसंतीने जो पुरुष आपण नवरा म्हणून निवडतो त्याला सुख देणं हे स्त्रीचे कर्तव्य नाही का? आणि मग संसारात भांडणे सुरू होतात.

असे पुरुष सेक्ससाठी मैत्रीण करतात असे अजिबात नाही. मैत्री ही अशी गोष्ट आहे की आपण कोणाशीही ती जोडावी म्हटलं तर जुळत नाही. आपल्या आयुष्यात काही माणसे अचानक येतात पण त्यांचा थोडा सहवास सुद्धा हवा हवासा वाटतो. त्यावेळी आपण त्यांच्या इतर कोणत्याही गोष्टी पहात नाही तर त्यांचा स्वभाव मन एकदम आवडून जाते.

पुरुषाने एखाद्या स्त्रीशी मैत्री केली की त्याला बाईलवेडा म्हटले जाते. पण असे का म्हणावे? भिन्नलिंगी मैत्रीमध्ये जर विश्वास, प्रेम, जिव्हाळा व आत्मीयता असेल तर ती कां करू नये? या मैत्रीकडे दूषित दृष्टीने पाहूच नये. दुसरे असे की सगळ्याच पुरुषांना मैत्रिणी भेटतात असे मुळीच नाही. आपण करत असलेल्या व्यवसायानुसार, परिस्थितीनुसार आपल्याला भेटणाऱ्या माणसांचं मैत्र होणं अवलंबून असतं.

आज-काल घटस्फोट बरेच होताना दिसतात. हे घटस्फोट पाहिले की मला व. पु. काळे यांची मांजरीची गोष्ट आठवते. घरातली मांजरी ज्याच्या – त्याच्यात तोंड घालायला लागली की तिचा मालक राग- राग करायला लागतो. पण तिने असे करणे सोडले की मालक तिच्यावर प्रेम करू लागतो. म्हणजे समोरचा आपल्या मनासारखे वागत असेल तरच आपण त्याच्यावर प्रेम करायचे का? याला प्रेम कसे म्हणायचे? ज्याच्यावर आपले खरे प्रेम असते. त्याच्या आपल्याला न आवडलेल्या गोष्टी आपण खपवून घेतो. आपल्या मनासारखे वागणाऱ्यावर कोणीही प्रेम करतं. त्याच्यावर प्रेम करणं, त्याला समजून घेणं, जेव्हा तो आपल्या मनासारखं वागत नसतो. प्रत्येकाला स्पेस हवीच. विचारांचे, मतांचे, वागण्याचे स्वातंत्र्य हे हवेच. नाहीतर माणसाला आपल्या आवडीप्रमाणे जगताच येणार नाही. हे उभयपक्षी आहे.

नवरा-बायकोत वाद झाला तर एकाने आपला अहंकार बाजूला ठेवून माघार घ्यावी. म्हणजे वाद संपतो. टोकाची भांडणे होऊनसुद्धा जेथे संवाद बंद होत नाही ते

नातं उत्तम! नवरा बायकोत उत्तम मैत्री असायला हवी. म्हणजे मग संसारात फारसे प्रश्न उद्भवतच नाहीत!

संसार हा भातुकलीचा खेळ नसतो. भातुकलीमध्ये खोटे खोटे वधुवर असतात.

तेव्हा मर्यादा सांभाळून मस्त जगावं. आनंदी राहून दुसऱ्याला आनंद द्यावा. मैत्र जपावं. त्यामुळे मिळणारा आनंद खूप मोठा आहे. इतर नातेवाईकांप्रमाणे मित्र हा एक जीवनाचा घटक आहे. निकोप मनाने त्याकडे पहायला हवं.


पूर्वी मुला- मुलींच्या शाळा वेगवेगळया असतं. पण नंतर हे बदलले. मुलगा- मुलगी एकाच शाळेत शिकू लागले. हेतू हाच की भिन्न लिंगी व्यक्तीबद्दल कुठल्याही तऱ्हेचा वेगळेपणा वाटू नये. मानसशास्त्रीय अभ्यासानेच हे बदलले. त्यामुळे साहजिकच मुलगा- मुलगी यांची मैत्री व्हायला लागली. आपल्या घरातील संस्कार जर उत्तम असतील तर अशी मैत्री निश्चितच निकोप राहील.


आयुष्याच्या संध्याकाळी सुद्धा अशी मैत्री होऊ शकते. त्याला कुणीही म्हातारचळ म्हणू नये. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मैत्रीचे योगदान खूप मोठे आहे.

तेव्हा मित्र असो नाहीतर मैत्रीण असो तिला जपा. कारण काहीवेळा पुरुष मोकळेपणाने मैत्रिणीला अनेक गोष्टी सांगू शकतो की ज्या तो बायकोला सांगू शकत नाही!

जयश्री पटवर्धन यांची ईसाहित्य वरील पुस्तकं.

क्लिक करताच उघडेल



मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्या-बरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तर आम्ही यापुढे जाऊन एक विनंती करू इच्छितो. आपले अनुभव लिहा. आपले आयुष्य शब्दांत मांडा. लिहिणे जमत नसेल तर मोबाईलवर तुमच्या आवाजात रेकॉर्ड करा. तुमच्या आयुष्ताल्या घटना या येणाऱ्या पिढ्यांना दिपमार्ग ठरतील.

बाकी आमच्यावर सोपवा.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

लिहायलाही हवं!

www.esahity.com
esahity@gmail.com

9869674820